# प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : **स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी**

**वर्ष : 42 अंक 147 कोल्हापूर ता. 20 मार्च 2014**

Reg. No. GR/RNP/KLP 136/12-14 Posted in Kolhapur

# आम्ही भिडे

जानेवारी २०१४ अंक १८ वा, वार्षिक


















Reg. No.GR/RNP/KLP 136/12-14 Posted in Kolthapur RMS



॥ श्री व्याडेश्वर प्रसन्न ॥



## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान



नित्युंदन ऋषी


आम्ही भिडे अंक १८ वा

**संपादक** : श्री. शशिकुमार केशव भिडे

**कार्यकारी संपादक** : श्री. दिलीप भिडे

**संपादक मंडळ** : श्री. प्रभाकर भिडे ले.क. सुनील भिडे, श्री. चिंतामणी भिडे, श्री. बिलास भिडे, सौ. प्रिया भिडे, श्री. विजय अ. भिडे, सौ. पूर्वा देवधर

**सल्लागार मंडळ** : श्री. सुनील भिडे (अभिरूची), शशिताई घुले, श्री. अरविंद भिडे, श्री. प्रभाकर वा. भिडे

**अक्षर जुळणी** : रविंद्र पाटणकर



साप्ताहिक प्राजक्त

संस्थापक व आद्य संपादक : स्व. पुरुषोत्तम कुलकर्णी

वर्ष : 42 अंक 147 कोल्हापूर ता. 20 मार्च 2014

Reg. No. GR/RNP/KLP 136/12-14 Posted in Kolhapur

आम्ही भिडे

नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान

मुखपत्र (खाजगी वितरण)

**अंक अठरावा** **जानेवारी २०१४**



**भिडे प्रतिष्ठान** - संस्था नोंदणी क्र. ई - २०१४० (मुंबई)

**पुणे कार्यालय** : ९२, शुक्रवार पेठ, रंजन को.ऑ.हौ. सोसायटी, मंडई गणपतीजवळ, पुणे - ४११००२. दूरध्वनी : ९६५७५४१२३६ किंवा ९८२२०२४८४९.

**ठाणे कार्यालय** : शिवानंद सोसायटी (बेसमेंट), सुळे पार्क, टाईम्स ऑफ इंडिया ऑफिसचे खाली, एम्.जी.रोड, नौपाडा, ठाणे (प.) ४०० ६०२

दूरध्वनी : ९९३०५०८५०६ किंवा ९८९२५६३१५४

e-mail - office@bhidekul.in website : www.bhidekul.in


## - संपादकीय -

आम्ही भिडे अंक विनामूल्य पाठविला जातो. प्रतिष्ठानकडे उपलब्ध असलेल्या पत्त्यानुसार अंक पाठवून सुद्धा दर महिन्याला काही अंक पत्ते बदलल्यामुळे अथवा काही सभासदांचा मृत्यु झाल्यामुळे किंवा तत्सम कारणाने अंक परत येत आहेत. ह्या वेळेस अशी संख्या ५० च्या घरात आहे. म्हणून ह्या अंकापासून परत आलेल्या अंकाच्या पत्त्यावर अंक पाठविला जाणार नाही. त्या ऐवजी आम्ही भिडेच्या या अंकात त्यांची नावे व पत्ता जाहीर करून अशा अंकाच्या बदललेल्या पत्त्याप्रमाणेच अंक पाठविले जातील परंतु त्याकरिता बदललेला पत्ता आमचेकडे पोहोचणे आवश्यक आहे. तसेच अंक परत येणे, अचुक पत्ता नसल्यामुळे अंक न मिळणे, ह्याकरिता उपाय म्हणून अंक मिळावा म्हणून प्रत्येक भिडे कुल बंधु/भगिनी व माहेरवाशीणींनी म्हणजेच भिडे कुलोत्पन्नाने आम्हास एक पत्र पाठवून अथवा office@bhidekul.in ह्या ई-मेलवर कळवावे अशी विनंती करीत आहोत.

आम्ही भिडे अंक आपल्या करिताच आहे. त्यामध्ये लेख, उल्लेखनीय व चमकदार कामगिरी, पाककृती, प्रवासवर्णने, आयुष्यातील अविस्मरणीय प्रसंग अशा तऱ्हेची माहिती आमच्याकडे पाठवावी. थोडक्यात वाचकाला काहीतरी नवीन व वेगळेपणा हे वैशिष्ट्य जाणविले पाहिजे. तसेच आपल्या अंकाबद्दलच्या सूचना, कौतुक, तक्रारी, अपेक्षित बदल कळविल्यास त्याचा फायदा आपल्या सर्व भिड्यांना होईल. आपले मार्गदर्शन आणि सल्ल्यामुळे आम्हाला अधिक उर्जाच मिळेल. जानेवारी २०१४ चा अंक म्हणजे मकर संक्रमणाच्या 'तिळगुळ घ्या व गोड बोला' म्हणण्याचा असा आहे.

सातारा संमेलनामध्ये पुढील वर्षी डोंबिवली येथे संमेलन घ्यायचे ठरले. त्याप्रमाणे श्री. अरविंद, सुभाष, प्रदीप, जनार्दन, देवेन्द्र, ॲड. अलकाताई, पूर्वाताई, संपदा, कु. वैभवी यांच्या सहभागामुळे व प्रयत्नाने हे शक्य होत आहे. पुढील वर्षी नाशिक, गोवा किंवा इंदोर येथे संमेलन घ्यायचा मानस आहे. बघु या डोंबिवलीमध्ये पुढील वर्षाचे संमेलन कोठे ठरते आहे.

# सर्व जाहिरातदार, बॅनर्स, देणगीदार, आश्रयदाते व हितचिंतकांचे प्रतिष्ठान मनःपूर्वक आभारी आहे !



## नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठानला आपल्या वाढदिवसानिमित्त देणगी देऊन आपला वाढदिवस साजरा करा


**भिडे कुलातील ज्या व्यक्तींचा नुकताच स्वर्गवास झाला अशा सर्व मृतात्म्यांना भिडे प्रतिष्ठान श्रद्धासुमन अर्पण करीत आहे आणि त्या सर्वांना सद्‌गती प्राप्त होवो हीच ईश्वर चरणी प्रार्थना !**


**नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान**

पुणे कार्यालय : ९२, शुक्रवार पेठ, रंजन को.-ऑप. हौसिंग सोसायटी, मंडई गणपती जवळ, पुणे - ४११ ००२

फोन : दिलीप भिडे ९६५७५४१२३६

• पत्रव्यवहारासाठी पत्ता •

विनायक वि. भिडे

५५३, नारायण पेठ, माती गणपती जवळ, भिडे वाडा, पुणे ४११ ०३०.

फोन - २४४५३२७४ मोबा : ९५५२२१६९६७


## - अनुक्रमणिका -


| | |
|---|---|
| विवाह सुवर्णोत्सव | १ |
| 'आम्ही भिडे' च्या १७ व्या अंकाचे प्रकाशन | ७ |
| चित्पावनी बोली भाषेच्या प्रबंधाचे प्रकाशन | ९ |
| भिडे प्रतिष्ठान कार्यकारिणी | ११ |
| विद्यार्थी गुणगौरव व ऋषितुल्य | १३ |
| प्रतिष्ठानचे पुरस्कार | १९ |
| मागे वळून पाहताना... | १७ |
| मुंबईचे पहिले विभागीय संमेलन | १९ |
| भिडे भगिनींचा भोंडला | २० |
| प्रतिबिंब - एका पंखाची भरारी | २१ |
| मी का व कसा जैन झालो | २३ |
| आमची भिशी चाळीस वर्षांची झाली | २७ |
| आगळे अवलिये माय-लेक | २९ |
| सोळा संस्कार | ३१ |
| शांतिदूत लालबहादूर शास्त्री प्रश्नमंजुषा स्पर्धा | ३३ |
| धन्य असा पुत्र | ३५ |
| ऑक्टोबर ते डिसेबर २०१३ - देणगीदार | ३७ |
| भिडे प्रतिष्ठानतर्फे वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा | ३९ |
| अंक परत येणारे पत्ते | ४१ |


## विनम्र आवाहन

आम्ही भिडे च्या माध्यमातून आपल्याशी संवाद साधीत आहोत. आम्ही करीत असलेल्या प्रयत्नांना आपल्या सहकार्याची जोड अपेक्षित आहे. 'आम्ही भिडे' मुखपत्रासाठी छोटे माहितीपूर्ण लेख, कविता, उल्लेखनीय कार्य, पुरस्कार, सन्मान, कुटुंबातील जन्म-मृत्यू इ. बाबत माहिती प्रतिष्ठानच्या ठाणे/पुणे कार्यालयात पाठवावी. हा अंक शक्यतो जाहिरातीवरच अवलंबून असल्यामुळे आपण करीत असलेल्या उद्योग/व्यवसायाची जाहिरात प्रसिद्धीसाठी द्यावी. संपर्कासाठी बदललेले व अचूक पत्ते, ई-मेल तसेच आपल्या परदेशस्थ नातेवाईकांचे ई-मेल्स/पत्ते पाठवावेत. भिडे माहेरवाशीणींनी पत्ते आवर्जून पाठवावेत. 'आम्ही भिडे' अंकाचे वितरण विनामूल्य आहे; तरीसुद्धा जाहिरात आणि देणगीच्या स्वरूपात आर्थिक हातभार लावावा.

# विवाह सुवर्णोत्सव

## अविस्मरणीय क्षण

### १) श्री. सुरेश व सौ. साधना सुरेश भिडे

२० डिसेंबर १९६१ ह्या दिवशी गोवा पारतंत्र्यातून मुक्त झाला आणि आम्ही दोघे ह्याच दिवशी विवाहबद्ध झालो. १९६६ साली आम्ही गुजरात रिफायनरी, कोयली येथे बडोद्यातील घर सोडून रिफायनरीच्या क्वार्टर्समध्ये राहावयास गेलो होतो. आमचा दुसरा मुलगा सुनिल त्यावेळी जेमतेम ८-१० महिन्याचा होता. जूळ्यातील असल्याने अगदीच अशक्त व जन्मतः कमी वजनाचा असल्याने रोग प्रतिकारक शक्ती सर्व बाबतीत कमीच होता. आम्ही त्याला घेऊन रात्री १० च्या बसने रिफायनरीत जायला बस स्टँडवर येऊन बसलो होतो.




तो श्रावण-भाद्रपद असल्याने पावसाचा नेम नव्हता पण कंपनीच्या बसने जा-ये करायची असल्याने आम्ही पावसामधून जपण्याचे काहीच साधन जवळ घेतले नव्हते. अचानकच जोराचा वारा सुरू झाला व टपोरे थेंबही पडू लागले. सुनिल सौ च्या कडेवर होता तिने त्याच्या अंगावरून पदर लपेटून घेतला तरी आम्ही सर्व थोडेसे भिजलोच. सुनिल थरथर कापायला लागला व निपचित झाला. काय करावे याचा विचार करतोय तोच बस येताना दिसली.

मी सुनिलला मग जवळ पोटाशी धरून बसलो. सुनिलचे थरथरणे चालूच होते. आम्ही दोघेही घाबरलेल्या अवस्थेत होतो. घरी गेल्यावर डॉक्टरकडे घेऊन जाण्याचे ठरविले पण तो पर्यंत काय ? जवळजवळ तीस मिनिटांनी बस टाऊनशिपमध्ये पोहोचली. आता पाऊस नव्हता. मी धावत पळत सुनिलला घरात नेले व झोपवून पांघरुण घातले. माझे आई वडिल व मोठा मुलगा (वय ४ वर्षे) तेथेच होते, तेही विचारते झाले - काय झाले सुनिलला. माझे वडिलांनी सर्व परिस्थिती बघून मला विचारले काय रे ? आपल्या घरात ब्रँडी आहे नां ? मी 'हो' म्हणालो. हे बघ अर्धा चमचा ब्रँडी त्याला दे व हातावर पण थोडी चोळून सुनीलच्या तळहातावर व तळपायावर चोळून चोळून लाव. मी लगेचच तसे केले. आणि काय आश्चर्य २-३ मिनिटातच सुनील रांगत रांगत घरभर फिरू लागला व आम्हीपण चिंतामुक्त झालो.

ही, आमच्या गेल्या ५२ वर्षांच्या लग्न जीवनातील अविस्मरणीय घटना आम्ही कधीच विसरू शकत नाही. डॉ. सुनिल आता ४७ वर्षांचा आहे व पेडिएट्रीक कन्सल्टंट म्हणून डेरेन्थ व्हॅली हॉस्पिटल, यु.के. येथे काम करीत आहे.

## जे जे वांछिले, ते ते मिळाले

### २) सौ. सुमती भिडे व श्री. वामन भिडे

मी, सौ. सुमती भिडे व माझे पती वामन भिडे. आमच्या लग्नाला ७० वर्षे झाली. आयुष्यात दैवाने सुखाचे मापच उधळले. त्यामुळे सुखाच्या आनंदाच्या अनंत आठवणी उभयतांच्या मनात रूजलेल्या आहेत. त्यातील एक आठवण. संसारात कर्तव्यानुसार आलेल्या जबाबदाऱ्या यशस्वीरित्या सांभाळून जीवनात वाहत्या पाण्याप्रमाणे जीवनाच्या प्रत्येक टप्प्यात जसजसे जमेल तसे कला, क्रीडा, समाजकार्य, वाचन, लेखन करण्याची उभयतांना आवड. त्यातील क्रीडाक्षेत्रात थोडेसे यशस्वी होण्याची ही आठवण. पुण्यात शनिवार पेठेते एकत्र कुटुंबात ९ वर्षे रहात होतो. आम्ही दोघ आणि ३ मुले.

नव्यानेच सुरू झालेल्या रिसर्च अँड डेव्हलपमेंट (अंडर डिफेन्स) या खात्यात त्यांची अंबरनाथ येथे बदली झाली आणि शनिवार पेठेतील मध्यमवर्गीय आयुष्याला एकदम कलाटणी मिळाली. जुनाट भिंतींना चिरा गेलेल्या वाड्यातून आम्ही अंबरनाथ गावापासून दहा मैलांवर असलेल्या नव्या कोऱ्या बंगल्यात राहायला गेलो. नवी वसाहत कॉस्मोपॉलिटन. शेजारी हिंदी वाजपेयी वा बंगाली सेन, चक्रवर्ती, तमिळनाड अय्यर असे सर्व ! सर्व सोयींनी युक्त असे अत्याधुनिक क्लब, तिथे टेनिस, बॅडमिंटन खेळण्याची कोर्ट, स्वीमिंग पूल इ.



ह्यांनी तिथे बॅडमिंटन खेळण्यास सुरूवात केली. मला वाटले आपणही बॅडमिंटन खेळावे. ह्यांना म्हटले, मी पण येऊ का बॅडमिंटन खेळायला ? आणि मी जाऊ लागले. धाकटा संजय वर्षाचा, त्याला राघवच्या (आमच्या बंगल्याचा वॉचमन) कडे ठेवायचे.

तिथे जर्मन डायरेक्टर बॅरेंजगी, वैद्य पती-पत्नी (असिस्टंट डायरेक्टर) चावला, पती-पत्नी सेन ही सारी मंडळी बूट घालून कुशलतेने बॅडमिंटन खेळत होती. मी क्षणभर सर्दच झाले. शनिवारातील जोशी काकू, ब्रह्मे वहिनींची आठवण झाली. 'चल, आता आपली बॅच ! सराव कर' हे म्हणाले. मी रॅकेट हातात घेतली पण रॅकेट आणि फूल यांची गाठ पडेना. मला लहानपणीची घोडा पाणी खेळाची आठवण झाली. ह्यांना म्हटले आज एवढेच पूरे. दुसरे दिवसापासून हे ऑफिसमधून आले की लगेच क्लबमध्ये जाऊ लागलो. आणि बाकी सर्वजण क्लबमध्ये यायच्या आधी सराव करू लागलो. लवकरच हा खेळ मी आत्मसात केला. दरवर्षी क्लबमध्ये बॅडमिंटन स्पर्धा होत त्यात भाग घेण्या इतपत खेळ जमला. ७ वर्षे अंबरनाथला होतो. पुढे दोघांनी अनेक बॅडमिंटन स्पर्धातून बक्षिसं मिळविली. आमचा ग्रुप खडकी येथील ॲम्युनिशन फॅक्टरीच्या क्लबमध्ये खेळण्यासाठी आला. त्यात मी एकटी महिला होते. कल्याण येथील रिऑन फॅक्टरीतही आम्ही खेळायला गेलो. दोन्ही ठिकाणच्या डायरेक्टरांनी आम्हा उभयंताच्या खेळाचे कौतुक केले.

त्यानंतर भारत सरकारने पाषाण येथे (रिसर्च अँड डेव्हलपमेंट) ह्यांची पुणे येथे पण मोठी शाखा उभारली. आमची बदली पुण्यास झाली. सर्वांनी आम्हास सेंड-ऑफ दिला. आश्चर्य म्हणजे डॉ. बॅरेंजगी यांनीही आम्हास त्यांचे घरी जेवावयास बोलावले.

येताना आम्हाला फार वाईट वाटले, भरून आले. 'दोन ओंडक्यांची होते सागरात भेट' तसे झाले. परंतु आतापर्यंत बॅरेंजगी, सेन, वाजपेयी आणि बाकी सर्व आयुष्यात कधी भेटलेच नाहीत. पण त्या वेळच्या खेळाच्या मैत्रीच्या आठवणी मात्र अजूनही ह्रदयात जपून ठेवल्या आहेत. थोडक्यात तुमच्या अंगात थोडी एखाद्या विषयात कला असली तर आपोआप मैत्री जुळते. त्यात जातपात, हुद्दा, गरीब-श्रीमंत यांचे अडसर येत नसतात.

## सहजीवनाची ५५ वर्षे

### ३) सौ. व श्री. माधव भिडे, हैद्राबाद

आमची दुसरी कन्या चि. तेजस्विनी ही जून १९८४ ला बी.ई.इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियरींग पास झाली व नाशिक येथे मेलट्रॉन कंपनीमध्ये प्रॉडक्शन इंजिनियर म्हणून ऑगस्ट १९८४ पासून नोकरी करू लागली व तेव्हापासून तिच्या लग्नासाठी स्थळे पाहण्यास सुरूवात केली. बहुतेक इंजिनियर लोकांना मंगळ असतोच. चि. तेजस्विनीला मंगळ असल्यामुळे स्थळांची नकार घंटा वाजू लागली. चि. तेजस्विनीची अट होती की तिचा जोडीदार इलेक्ट्रॉनिक्स इंजिनियर क्षेत्रातीलच असला

पाहिजे. १९८८ साल उजाडले तरी तिची नोकरी सुरूच होती. आमचे नातेवाईक व मित्र मंडळी म्हणू लागली की मुलगी मिळवती आहे म्हणून तिचे लग्नाबद्दल काही खटपट करीत नाहीत. माझ्याकडे नाशिक डिव्हिजन शिवाय कोल्हापूर डिव्हिजनचा ॲडिशनल चार्ज असल्यामुळे महिन्यातून २० दिवस दौरे करावे लागत. माझ्या पत्नीने पण माझ्याकडे तक्रार सुरू केली की मी स्थळे पाहण्यात दिरंगाई करीत आहे. तिच्या म्हणण्याप्रमाणे मी २-३ महिने रजा घेऊन लग्नासाठी खटपट करावी. उलट मी तिला सांगत होतो की वेळ आल्याशिवाय कोणतीही गोष्ट होत नाही व झालेही तसेच !



१९८८ मार्च ही आर्थिक वर्ष संपण्याची वेळ, मी कोल्हापूरला होतो. अचानक श्री. गोखले यांना नाशिकला फोन आला की, त्यांचा मुलगा श्री कल्याण हा पी.एच्.डी. इलेक्ट्रॉनिक इंजिनियर अमेरिकेत असतो व त्याची व चि. तेजस्विनीची पत्रिका जुळते आहे व फोटोवरून श्री. व सौ. गोखले यांनी मुलगी पसंत केली आहे. मुलगा ३० मार्च १९८८ ला भारतात येणार आहे. मुलाची पसंती फायनल असणार आहे. तरी मुलीला मुंबईला दाखविण्यास आणावी. त्यावेळी माझी थोरली मुलगी चि. सौ. तिलोत्तमा भागवत ही नवी मुंबईत रहात होती. पण ती सहजच नाशिकला आली होती. कोल्हापूरला मला निरोप कसा द्यायचा याची चिंता माझ्या पत्नीला होती. पण माझ्या टेबलावर एक डायरी होती. त्यावर कोल्हापूरच्या ऑफिसचा फोन नंबर होता. त्या फोनवर मला २२ मार्चला निरोप मिळाला. पण याच वेळी माझे वरिष्ठ सुपरिंटेंडिंग इंजिनियर कोल्हापूरला आले होते व मी त्यांना माझ्या घरगुती कामाच्या निकडीची गोष्ट सांगितली व त्यांनीही काही आढेवेढे न घेता मला सांगलीला जाण्याची परवानगी दिली. त्याप्रमाणे मी रात्रीच २२ मार्चला सांगलीला जाऊन श्री. गोखले यांना मुंबईचा पत्ता दिला व ३१ मार्चला मुंबईला मुलगी दाखविण्याचा कार्यक्रम झाला. २ एप्रिल १९८८ ला श्री. गोखले यांचा फोन आला व मुलाला मुलगी पसंत असल्याचे कळवले. आम्ही दोघे २ एप्रिललाच सांगलीला गेलो व लग्नाची तारीख पक्की करून आलो. सर्वांना फोनवरून आमंत्रण दिले व १० एप्रिल १९८८ ला लग्न व्यवस्थित उत्तम रितीने पार पडले. सांगायचा मुद्दा असा की वेळ आल्याशिवाय कोणतीही गोष्ट होत नाही. ८ दिवसात कार्य व्यवस्थित पार पडले. याचे सारे श्रेय सर्व नातेवाईक मंडळींनी माझ्या पत्नीलाच दिले व त्याबरोबर भरभरून अभिनंदनही केले. झटपट व व्यवस्थित लग्नकार्य कसे करावे याबद्दल माझ्या पत्नीकडून शिकावे अशी शिफारस सर्वांनी केली.

## काळ आला होता

### ४) श्री. केशव मो. भिडे व अलका के. भिडे

आमचे लग्न ९ फेब्रुवारी १९६१ रोजी झाले. वैवाहिक जीवनाच्या ५२ वर्षाच्या काळातील अनेक कटु, सुखांच्या आठवणींचे मोहोळ, आपले आवाहन वाचल्यानंतर मनात घोंगावले.

उत्तराखंडातील नुकत्याच झालेल्या निसर्गातील प्रकोपामुळे केदारनाथ उत्तरकाशी परिसरात जे नुकसान झाले ते अपरिमित आहे. त्याच्या आठवणी लोकांच्या मनात ताज्या आहेत. यमनोत्री यात्रेच्या दरम्यान आम्हावर ओढवलेल्या दुर्धर प्रसंगाची आठवण देत आहे.

हरिद्वार ते यमनोत्री, गंगोत्री, केदारनाथ, बद्रीनाथ असा एकूण प्रवास १३५० कि.मी.चा; पैकी हरिद्वार ते यमनोत्री हा प्रवास २४७ कि.मी. पैकी हरिद्वार ते हनुमान चट्टी हा २३३ कि.मी. चा प्रवास बसने करता

येतो. आणि उरलेला १४ कि.मी. प्रवास पायी, घोडे, दंडी इ. करावा लागतो.

यमनोत्रीची उंची ३१६५ मीटर म्हणजे १०,५०० फुटांची ! जाताना कमालीचा खडतर प्रवास अवघड चढण, जेमतेम पाऊलवाट म्हणता येईल इतकाच मार्ग.



एका बाजूला कपारी, खडकांनी भरलेल्या उंचच्या उंच पर्वतांच्या रांगा, तर दुसऱ्या बाजूला अक्राळ-विक्राळ भासणारी खोल दरी, क्षणाक्षणाला बदलणारा निसर्ग ! पर्वत शिखरांवर, पर्वतांच्या घळीतून साठलेले बर्फ, ग्लेशियर, जराशा पावसाने होणारी निसरडं, चिखल. कितीही जोखमीने चालावयाचे म्हटले तरी घसरणे इ.

आम्ही हनुमान चट्टीला संध्याकाळी पोहोचलो आणि धुवाधार पाऊस सुरू झाला. पाऊस कमी होताच निघावयाचे ठरविले. आमच्या ग्रुपपैकी ७/८ जण ज्यांना पूर्वानुभव होता, त्यांनी पायी जावयाचे ठरविले. उरलेल्या लोकांनी काही अंतर पायी व नंतर घोड्यांनी असे योजले. आम्ही घोड्यांवर जावयाचे ठरविले. चुकामूक झाल्यास यमनोत्री करून जानकी चट्टीला यावयाचे असे ठरले.

मजल दरमजल करीत प्रवास सुरू झाला. जाताना सर्व चढ ! चढ असेल तेव्हा मागे झुकून व उतार असेल तेव्हा पुढे झुकून घोड्यावर स्वार व्हावयाचे अशा सतत सूचना घोडे मालकाने दिल्या. परत पावसाने जोर धरला. अत्यंत खडतर अशी चढण, जीव मुठीत धरून प्रवास सुरू झाला. वाट इतकी घसरडी होती की घोडेही बिचकत; एका बाजूला पर्वत, दुसऱ्या बाजूला खोल दरी, ब्रह्मांड आठवले. कसे बसे मंदिरापर्यंत पोहोचलो. घोडेस्वार थोडे खालीच थांबले होते.

पावसामुळे यात्रेकरू वरच अडकले होते. मंदिरात प्रचंड गर्दी. त्यात मला थंडीने हुडहुडी भरली. चहावाल्याजवळ गरम चहा मागितला तर दूध संपलेले, सभोवताली इतकी दुर्गंधी होती की थांबणे अशक्य ! मंदिराजवळ गरम पाण्याची दोन कुंडे आहेत. पण आमचे जवळचे सर्व कपडे ओले चिंब झाले होते. त्यामुळे आंघोळ करणे अशक्यच. जेमतेम १०/१५ मिनिटे थांबून, दुरूनच दर्शन घेऊन परतीची वाट धरली.

परतीचा प्रवास आणखी अवघड. उतारावर घोडे घसरण्याची शक्यता. जीव मुठीत धरून जानकी चट्टीला आलो. पण शोध घेऊनही आमच्या ग्रुपमधील कोणीच भेटले नाहीत. जेमतेम आडोशाला एक बारीक, अडचणीची खोली निवाऱ्याला मिळाली. मी थंडीने गारठून गेलो होतो. पाय ताठ झाले होते. पण पत्नीने आठवणीने औषधांबरोबर छोटीशी ब्रँडीची बाटली आणली होती. ती हातापयाला चोळली. रस्त्याच्या दुसऱ्या बाजूला छोटीशी टपरी होती. तेथे चहा घेतला. झोप येणे शक्यच नव्हते. रात्र कशीबशी काढली आणि सकाळीच परतीचा प्रवास सुरू केला.

घोडेस्वारांनी आम्हास हनुमान चट्टीला सोडावयाचे असे ठरले होते. तथापि थोडीशी वाटचाल केल्यावर आदल्या रात्रीच्या धुवाधार पावसाने कडे कोसळले होते. रस्ता वाहून गेला होता. जेमतेम पाऊलवाट होती. घोडे तेथेच सोडले. पुढे वाटचाल करू लागलो. तर मिलिटरीचे लोक गस्त घालीत इतरांना हाकलत होते. आम्हाला काही करून हनुमान चट्टीला पोहोचणे आवश्यक होते. एका अरुंद वाटेवर मी पुढे व मागून पत्नी असे चालत असतांना वरून पाण्याचा लोंढा आला. मला अंदाज आला नाही आणि पुढे पाऊल टाकणार तो क्षणार्धात पत्नीने मागे खेचले आणि ती ओरडली. मी जेथे पाय ठेवणार होतो ती जमिन खाली आणि तेथे दरी निर्माण झाली. प्रत्यक्ष मृत्यू डोळ्यांसमोर आला आणि अंधारी आली. आम्ही दोघे मागे सरकलो. पत्नीने मागे खेचले नसते तर मी दरीत कोसळलो असतो.

समोर एक कडा कोसळला होता. त्या बरोबर मोठा वृक्ष कोसळला होता. त्याच्या फांद्यांचा आधार घेऊन कडा पार करून पुढे गेलो. हनुमान चट्टीला पोहोचलो. पण तेथे कोणीच नव्हते. गाडीही नव्हती. पण सर्व बळ एकवटून आम्ही चालू लागलो. तेथे आमची गाडी दिसली आणि आमच्या जीवात जीव आला. आम्ही गाडीत बसलो. उर्वरित यात्रा त्या मानाने कमी कष्टात झाली. त्याचे वर्णन करीत नाही. यात्रा कशीबशी पूर्ण केली आणि पुण्याला परतलो. आज त्या प्रसंगाची आठवण झाली की अंगावर काटा येतो. काळ आला होता पण वेळ आली नव्हती. ही परमेश्वराची कृपा !

## माझ्या दुसऱ्या लग्नाची गोष्ट

**५) श्री. वासुदेव व सौ. पुष्पांजली भिडे, डोंबिवली**

पहिली पत्नी जिवंत असूनही दुसरे लग्न तिच्या अनुमतीशिवाय केले तर द्विभार्या प्रतिबंधक कायदा आड येतो आणि तो मोडण्याने होणारी शिक्षा माहिती असूनही मी ७७ वर्षांचा 'तरुण' असताना मी पुन्हा दुसरे लग्न केले. आता ह्या वयाला शोभेलशी तरुणी पाहिजे म्हणून ७० वर्षांची मुलगी मी पसंद केली. कारण वधु ७ वर्षांची असून चालणारच नव्हती नाहीतर 'शारदा' कायद्याखाली दुसरा गुन्हा झाला असता. त्यामुळे आमचे जोडपे हे मेड फॉर इच अदर, अगदी 'एक दुजे के लिये' असे जोडपे ठरले असते.

हे माझे लग्न झाले २४ मे २००९ साली. पण घरातल्या घरात. पोलिसांना घाबरून नव्हे तर जोडप्याच्या वयाचा विचार करून. आतां कुणाला मी अंधारात ठेवत नाही. माझी ही वधू होती ती माझी आताची सौभाग्यवतीच. आमच्या लग्नाला ह्या दिवशी ५० वर्षे पूर्ण होणार होती. आम्ही अजूनही तरुण दिसत आहोत, गोडीगुलाबीने एकत्र रहात आहोत आणि सुखी संसार करत आहोत हे पाहून कुटुंबियांनी पुन्हा आमच्या लग्नाचा घाट घातला. सर्वांनी पुढाकार घेऊन आमच्या लग्नाच्या ५० व्या वर्धापनदिनाचे निमित्त साधून.



सुवर्णमहोत्सवी लग्न सोहळा आयोजित केला होता. पुन्हा लग्न लावले याचे कारण त्यांनी असे सांगितले की तुम्ही लग्न केलेत पण आम्हाला आमंत्रण दिले नाही. आनंदाच्या भरात आम्हाला विसरलात. आम्ही तुमचे लग्न पाहिले नाही म्हणून आमच्या देखत पुन्हा लग्न करा. गोष्ट अगदी सही रे सही होती. मग लग्न सोहळ्यात करतात तशा दोघांना मुंडावळ्या बांधल्या गेल्या. मंगलाष्टके (अर्थात मीच केलेली) म्हटली गेली. गळ्यात पुष्पहार घातले गेले, पेढे वाटले गेले. जेवतांना माझ्या या नूतन पत्नीने घास देताना लाजत लाजत उखाणा म्हटला. मी ही घास प्रेमाने भरवताना एक उखाणा म्हटला. असा हा सर्वांच्या देखत आणि शेजाऱ्यांच्या उपस्थितीत मंगल सोहळा साजरा झाला. हल्ली जसे निमंत्रण पाहुण्यांना सांगितले होते (पण हे कुठे मानले जाते ते जाऊ द्या) याचे कारण आमचा संसार ह्या घरच्या निमंत्रितांमुळेच बहरला होता आणि आम्ही दोघांनी तो याची देही याची डोळा पाहिला होता. कारण ह्या सोहळ्याला सुरभि (राजूची मुलगी) आणि श्रुती आणि श्रेया (या मुलीच्या दोन मुली) अशा तीन नाती आणि अपूर्व हा नातू हजर होते आणि ह्याच्याच प्रेमळ पुढाकाराने हा सोहळा आयोजित केला गेला होता. अशी ही माझ्या दुसऱ्या लग्नाची कायदेशीर गंमतीदार गोष्ट.

~~~
~~~

BHIDE ASSOCIATES

Synthesis of Finance Technology and Management



Shri Madhavrao Bhide

Technical & Industrial Consultants, Valuers & Experts for rehabilitation / Revival of Sick Industries for banks & F.I.s experts in T.E.V. studies

Highly motivated & successful Chief Associates of Bhide Associates in India




A C Bhide
Pune



P J Bhide
Kolkata




M M Gadre
Chennai



Suhas Jogdand
Vodadara



Dr. R Z Chandak
Amravati



Arun Shendurnikar
Hyderabad



Sushil Sanghi
Nagpur



Prashant Raut
Mahim H.O.



Nitin Date
Nashik



Rajeshree Hajare
Raigad Region

Corporate valuers of all types of assets including flats, land, building, machinery, experts in techno economics viability studies and lenders engineers for all types of projects in India and abroad.
Consultants to 24 Nationalised, 5 Private Banks, 10 Co-op. Banks & 5 FIs

**BHIDE ASSOCIATES** Well Established For 21 Years
Synthesis of Finance, Technology and Management

Head Office - **Mahim,** Branch Offices - **Flora Fountain, Bandra and Virar**

**Total 16 Regional Offices in India** - Amravati, Ahmedabad, Aurangabad, Belgaum, Bangalore, Chennai, Delhi, Goa, Hyderabad, Indore, Kolkata, Mumbai, Nagpur, Nashik, Pune, Pen, Sangli-Kolhapur, Vadodara

# आम्ही भिडे च्या १७ व्या अंकाचे प्रकाशन

'आम्ही भिडे' हे त्रैमासिक भिडे कुलबंधु/भगिनी व माहेरवाशिणी यांच्यातील एक दुवा आहे. भिडे कुलातील लोकांना एकमेकांपर्यंत पोचण्याचे, आपले विचार एकमेकांना प्रदान करण्याचे हे प्रभावी माध्यम आहे. २० ऑक्टोबर २०१३ रोजी 'आम्ही भिडे' १७ व्या अंकाचा प्रकाशन सोहळा पुण्यात पार पडला. दै. सकाळचे माजी सरव्यवस्थापक व जेष्ठ पत्रकार मा. श्री. केशव मोरेश्वर भिडे यांच्या हस्ते या अंकाचे विमोचन झाले. या समारंभासाठी नित्युंदन गोत्रिय भिडे प्रतिष्ठानचे




अध्यक्ष मा. श्री. माधवराव भिडे, कार्याध्यक्ष श्री. प्रभाकर भिडे, सचिव श्री. प्रभाकर भिडे, माजी नगरसेवक (कल्याण) श्री. अरविंद भिडे असे अनेक मान्यवर उपस्थित होते.

जेष्ठ पत्रकार श्री. के. मो. भिडे यांनी आपल्याला पत्रकारितेत आलेले अनेक अनुभव कथन केले. भिडे कुलातील लोक नेहमीच विविध क्षेत्रात अग्रभागी असतात याचे दाखलेही दिले. १९३२ साली कै. श्री. नानासाहेब परुळेकर यांना नवीन वृत्तपत्राकरिता सोपे सुटसुटीत नांव हवे होते; त्यासाठी त्यांनी एक स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेत फर्ग्युसन कॉलेजच्या एका काशिनाथ लक्ष्मण भिडे ह्या विद्यार्थ्याने नानासाहेब परुळेकरांच्या वृत्तपत्राला 'सकाळ' हे नाव सुचवुन ४०० रुपयांचे प्रथम पारितोषिक मिळविले. त्या भिडे विद्यार्थ्याने सुचविलेले 'सकाळ' हे नाव आज जगाच्या कानाकोपऱ्यात पसरलेले आहे ह्याची आठवण श्री. के. मो. भिडे यांनी उपस्थितांना सांगितली. भिडे प्रतिष्ठानकरिता वृत्तपत्राच्या माध्यमातून काही मदत हवी असल्यास मी अवश्य करीन असे सांगून प्रतिष्ठानला आश्वस्त केले. जेष्ठांचा हा मौलिक आधार हे प्रतिष्ठानचे संचित आहे. श्री. के. मो. भिडे यांची प्रकृती बरी नसतानासुद्धा ते प्रकाशन सोहळ्यासाठी उपस्थित राहिले त्याबद्दल प्रतिष्ठान त्यांचे ऋणी आहे.

'आम्ही भिडे' अंकाची आर्थिक व तांत्रिक बाजू व ह्या संबंधीच्या वाचकांच्या आणि प्रतिष्ठानच्या अपेक्षा याविषयी श्री. दिलीप भिडे यांनी मनोगत सांगितले. ह्याच दिवशी त्यानंतर प्रतिष्ठानची वार्षिक सर्वसाधारणसभा प्रकाशनाच्या कार्यक्रमानंतर सुरू झाली. सभेच्या सूचनेचे वाचन सहसचिव श्री. दिलीप भिडे यांनी तर गतवर्षीच्या अहवालाचे वाचन श्री. प्रभाकर भिडे यांनी केले. कोषाध्यक्ष श्री. चिंतामणी भिडे ह्यांनी अहवालाबाबत शंकांचे निरसन केले व त्यानंत अहवालाला मंजुरी मिळाली. कार्यकारिणीमध्ये नवनियुक्त सदस्यांची नांवे व त्याचबरोबर प्रतिष्ठानमध्ये महिलांचा एक विभाग करून ह्या विभागांत ५ महिला सदस्यांची समिती स्थापन केली. त्यांची नावे जाहीर करण्यात आली. तसेच प्रतिष्ठानची सध्या अस्तित्वात असलेल्या घटनेमध्ये दुरुस्ती करणे आवश्यक असून त्यामध्ये घटना दुरुस्तीमध्ये काय अपेक्षित बदल करावेत ह्यासंबंधी अभ्यासपूर्ण विवेचन श्री. अरविंद भिडे यांनी केले. याकरिता एक ५ जणांची समिती नियुक्त करावी अशी सूचना मा. अध्यक्षांनी केली आणि त्याप्रमाणे ५ जणांना नियुक्त केले.

या समारंभासाठी कल्याण-डोंबिवली, सातारा येथून बरेच कुलबंधू/भगिनी आले होते. ह्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री. दिलीप भिडे यांनी केले व ले.क. सुनील भिडे यांच्या आभारप्रदर्शनानंतर अल्पोपहाराचा आस्वाद घेऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

~~~
~~~


टीजेएसबी बँक
विश्वास जिंदगी भर का
लहान असोत वा मोठी स्वप्ने असतात साकारण्यासाठी
टीजेएसबी वैयक्तिक कर्ज तुम्हाला देत आहे एक हवेहवेसे
वाटणारे सोयी-सुविधायुक्त जीवन
प्रवास कर्ज
शैक्षणिक कर्ज
समारंभ कर्ज
गृह दुरुस्ती कर्ज
वाहन कर्ज
Enjoy
LOW
EMI
कर्ज मिळवा
४८
तासात
प्रशासकीय आणि नोंदणीकृत कार्यालय :
टीजेएसबी हाऊस, प्लॉट क्र. बी ५, रोड क्र.२, वागळे इंडस्ट्रिअल इस्टेट,
ठाणे (पश्चिम)-४०० ६०४. | टोल फ्री क्र.: १८०० २२३ ४६६ | www.tjsb.co.in

# चित्पावनी बोली भाषेच्या प्रबंधाचे प्रकाशन

सौ. वसुधा भिडे, पुणे



दि. १८-१०-२०१३ या दिवशी महाराष्ट्र चित्पावन संघात 'कोजागर' कार्यक्रमात माझ्या प्रबंधाचे थाटात प्रकाशन झाले. यशवंतराव चव्हाण नाट्यगृह तुडुंब भरलेले होते. सूत्रसंचालन सौ. रागिणी चितळे यांनी चित्पावनीत केले. श्री. रा. का. बर्वे यांच्या हस्ते प्रकाशन झाले. हे त्यांनी चित्पावनीत सांगितले. नंतर मनोगत व्यक्त करतांना मी म्हटले, 'गेले तीस वर्षे ज्या सोनेरी दिवसाची मी वाट पाहात होते तो सोनेरी दिवस आज उजाडला याचा मला मनापासून आनंद होत आहे. चित्पावन ब्राह्मण संघाने हे प्रकाशन करावे अशी माझी इच्छा होती ती पूर्ण झाली. त्याबद्दल चित्पावन ब्राह्मण संघाचे पदाधिकारी व सभासद यांना अनेकानेक धन्यवाद !

परंतु हे सर्व ज्यांचेमुळे घडले ते कै. वामनराव खाजगीवाले आज आपल्यात नाहीत याचे दुःख आहे. त्यांनी प्रबंधाचे प्रकाशन व्हावे, चित्पावनी बोलीला ग्रंथिक स्वरूप यावे यासाठी त्यांनी अत्यंत मेहनत घेतली. वयोमानाप्रमाणे तब्येतीच्या तक्रारी असूनही अविश्रांत श्रम घेतले त्यामुळेच हे कार्य सिद्धीस गेले. कृतज्ञता म्हणून हे पुस्तक मी त्यांनाच अर्पण केले आहे. ते गेल्यानंतर हे काम कसे पूर्ण होईल अशी चिंता वाटत होती. पण श्री. कुमार लिमये यांनी सर्व प्रकारची मदत करून हे कार्य सिद्धीस नेले. त्यांना विनोद खाजगीवाले, श्री. मुकुंद गोखले (टाईपसेटर) यांनी मदत केली. त्याबद्दल तिघांनाही धन्यवाद द्यावेत तेवढे कमीच आहेत. शेवटी सर्व उपस्थितांना धन्यवाद ! जमलेल्या चित्पावन मंडळींमुळे ''चित्पावनी''ची शोभा वाढली आहे.

## जॉईन चित्पावन मूव्हमेंट

दिनांक २७ आणि २८ डिसेंबर २०१४ रोजी चित्पावन फौंडेशनच्या वतीने तरूण पिढीला व्यवसाय व उद्योगासाठी उद्युक्त करण्यासाठी वर्कशॉप्स घेण्यात येणार आहेत. या करिता व्यावसायिक आणि व्यवसाय सुरू करणारा तरूण वर्ग अशा संलग्न व अनेक व्यवसायातील व्यावसायिकांच्या कॉन्फरन्सेस पुण्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी चित्पावन फौंडेशन आयोजित करीत आहे. त्यामध्ये मार्गदर्शन, प्रशिक्षण, डिस्ट्रिब्युटरशिप किंवा एजन्सी देणे-घेणे कार्यशाळा इत्यादी प्रकारे सर्वतोपरी मदत व सहाय्य मिळणार आहे. तरी भिडे कुलोत्पन्नातील तरुण, तरुणींनी या संधीचा जरूर लाभ घ्यावा. या कॉन्फरन्समध्ये सर्वश्री श्री. प्रमोद लेले (अध्यक्ष-चित्पावन फौंडेशन), उद्योगपती श्रीकांत परांजपे, दत्तोपंत म्हैसकर, कॅमलिनचे सुभाष दांडेकर, राम भोगले, दीपक घैसास, अनिल नेने आणि चित्पावन फौंडेशनचे समन्वयक श्री. अशोकराव वझे या सारख्या दिग्गजांचे मार्गदर्शन मिळणार आहे. या संधीचा लाभ घेण्यासाठी विसरू नका.

**अधिक संपर्कासाठी : दिलीप भिडे, पुणे. संपर्क. मो. ९६५७५४१२३६**


आमचे ध्येय..
परिपूर्ण औद्योगिक सहाय्य !
NORTON
GRINDWELL NORTON LTD
GRINDING WHEELS
COATED
DIMOND & CBN
NON-WOVEN (BEAR-TEX)
SAINT-GOBAIN
ABRASIVES
TOTEM
FORBS GOKAK LTD.
FORBES RECISION TOOLS
MIRANDA
Fenner
V-BELTS
POLY-F PLUS
THE MATCHLESS PERFORMER
LENOX
Bimetal Bandsaw
TAPARIA
Hand Tools
ADDISON
High Speed Steel
METAL CUTTING TOOS
TRUMAX
MACHINE TOOL ACCESSORIES
PIONEER
WHEELS CASTORS & TROLLEYS
भिडे यंत्र लोह वस्तु केंद्र
मुख्य शाखा
730, गणपती पेठ, सांगली. 416 416 फोन : 0233 - 2373220, 2326478 Email : bylvk@dataone.in
कोल्हापूर शाखा
448/बी, पूना-बेंगलोर हायवे, मु. पो. नागाव, 416 122 फोन : 0231 - 2469448/49

# भिडे प्रतिष्ठान कार्यकारिणी

१) अध्यक्ष - श्री. माधव चिं. भिडे (मुंबई)
२) उपाध्यक्ष - श्री. मुकुंद लक्ष्मण भिडे (वसई)
३) उपाध्यक्ष - श्री. कुमार विष्णू भिडे (सांगली)
४) कार्याध्यक्ष - श्री. शशिकुमार केशव भिडे (पुणे)
५) कार्याध्यक्ष - श्री. चंद्रकांत शं. भिडे (ठाणे)
६) सेक्रेटरी - श्री. प्रभाकर शंकर भिडे (डोंबिवली)
७) जॉईंट सेक्रेटरी - श्री. दिलीप वा. भिडे (पुणे)
८) कोषाध्यक्ष - श्री. चिंतामणी ज. भिडे (ठाणे)
९) सहकोषाध्यक्ष - श्री. माधव पुरुषोत्तम भिडे (पुणे)
१०) सदस्य - श्री. श्रीधर गो. भिडे (मुंडाजे) कर्नाटक
११) सदस्य - डॉ. विवेक यशवंत भिडे (रत्नागिरी)
१२) सदस्य - श्री. अजय भालचंद्र भिडे (मुंबई)
१३) सदस्य - ले.क. सुनील वा. भिडे (पुणे)
१४) सदस्य - श्री. विजय अनंत भिडे (ठाणे)
१५) सदस्य - श्री. चेतन विश्वनाथ भिडे (पुणे)
१६) सदस्य - श्री. विनायक विश्वनाथ भिडे (पुणे)
१७) सदस्य - श्री. प्रभाकर लक्ष्मण भिडे (पुणे)
१८) सदस्य - श्री. बळवंत दत्तात्रय भिडे (अमळनेर)

**नवनियुक्त कार्यकारिणी सदस्य**

१) **डॉ. मोरेश्वर विश्वनाथ भिडे** : प्रथम कार्यकारिणीवर निवड. हे सातारा येथील निवासी असून त्यांचा जन्म १९४८ साली झाला. शिक्षण बी.ए.एम्.एस्. आर्यांग्ल वैद्यक महाविद्यालय/हॉस्पिटल, सातारा येथे १९७३ ते २००८ पर्यंत विविध पदांवर काम.



निवृत्त होताना त्यांनी शल्य विभागाचे प्रमुख या पदापर्यंत प्रगती केली. शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरच्या आयुर्वेदीक फॅकल्टीचे बोर्ड ऑफ स्टडीज्, त्याचप्रमाणे ॲकॅडमिक कौन्सिल महाराष्ट्र मेडिकल असोसिएशनमध्ये देखील सक्रिय होते. सातारा भिडे कुलसंमेलनाच्या आयोजनात त्यांचा महत्वाचा वाटा होता.

२) **श्री. प्रशांत सदानंद भिडे** : प्रथमच कार्यकारिणीवर निवड. यांचे सातारा येथे वास्तव्य असून त्याचा जन्म १९६३ साली झाला आहे. शिक्षण बी.कॉम. स्वतःची एक्साईज कन्सलटन्सि आहे व सुमारे ८०-९० कंपन्या त्यांच्याकडून मार्गदर्शन घेत आहेत.



सामाजिक कार्याची आवड आहे. त्यांनी सातारा संमेलन यशस्वी व उत्कृष्टपणे पार पाडण्यात खूप मोलाची कामगिरी केली.

३) **श्री. प्रदीप जनार्दन भिडे,** डोंबिवली : प्रथमच कार्यकारिणीवर निवड. यांचे डोंबिवली येथे वास्तव्य असून त्यांचे बी.कॉम. पर्यंत शिक्षण झाले असून ते नवी मुंबई येथे एका खाजगी कंपनीत नोकरी करतात. चांगल्या कामाबद्दल कंपनीतर्फे परदेशी जाऊन आले



आहेत. भिडे कुलसंमेलन व इतर कार्यक्रमांमध्ये सक्रीय सहभाग. सामाजिक कार्याची आवड. डोंबिवली संमेलनाची नियोजनाची जबाबदारी. स्वर्गीय दामुकाका भिडे यांचे पुतणे.

४) **श्री. देवेन्द्र रविन्द्र भिडे,** कल्याण : कार्यकारिणीत प्रथमच निवड. स्वतःची टॅक्स कन्सल्टंटसी कल्याण येथे फर्म आहे. कार्यकारिणीत सर्वात तरुण सदस्य. हरहुन्नरी व्यक्तीमत्त्व आणि प्रतिष्ठानच्या कामात अतिशय उत्साह दाखवून प्रतिष्ठानची वेबसाईट व



फेसबुकच्या माध्यमातून त्वरीत संवाद साधण्यासाठी विशेष प्रयत्नशील आणि सक्रीय सहभागी.

## महिला विभाग समिती सदस्य

**१) सौ. पूर्वा प्रमोद देवधर (भिडे), मुंबई :** महिला विभाग समितीच्या प्रतिनिधी म्हणून प्रथमच निवड. या पदवधीर असून वृत्तपत्र, दिवाळी अंक वगैरेसाठी कथालेखन करतात. आकाशवाणीवर 'माझी गाणी' हा कार्यक्रम सादर केला आहे. मुंबईतील पहिल्या विभागीय संमेलनामध्ये सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळली होती. हिंदी, मराठी व गुजराथी या भाषा अवगत आहेत. एकांकिका व नाट्यछटामध्ये अनेक पारितोषिके प्राप्त केली आहेत.



**२) सौ. संपदा राजेंद्र भिडे, दादर :** महिला विभाग समितीच्या प्रतिनिधी म्हणून प्रथमच निवड. या पदवीधर असून मुंबईमध्ये दादर येथे 'कायाकल्प' नावाचे ब्युटीपार्लर चालवितात. ब्राह्मण सेवा मंडळ, दादर येथे सांस्कृतिक समिती सदस्य म्हणून काम करतात. मुंबईमध्ये नुकत्याच झालेल्या पहिल्या विभागीय संमेलनामध्ये सूत्रसंचालनाची जबाबदारी सांभाळली होती.



**३) ॲड. सौ. अलका सुभाष भिडे, कल्याण :** महिला विभाग समितीच्या प्रतिनिधी म्हणून प्रथमच निवड. माजी न्यायाधीश गोविंदराव रिसबूड ह्यांची कन्या ह्या एम्.ए.एल्.एल्.बी. असून व्यवसायाने वकील आहेत. न्यायालयात दिवाणी आणि विवाह विषयक दावे लढविण्यात विशेष रस आहे. महिला उत्कर्ष मंडळ, कल्याण ह्या संस्थेच्या प्रमुख विश्वस्त असून आयडिया कंपनी आणि बँक ऑफ महाराष्ट्रच्या कायदे सल्लागार मंडळावर कार्यरत आहेत. त्यांच्या सामाजिक बांधिलकीच्या नात्यामुळ भिडे प्रतिष्ठानच्या कुलसंमेलाबरोबरच इतर कार्यक्रमांमध्ये उत्स्फूर्त सहभाग असतो. कायदे तज्ञ असल्यामुळे भिडे प्रतिष्ठानची घटना अथवा धर्मादाय कार्यालयीन कामकाजासंबंधीत काही बाबतीतसुद्धा आपले योगदान देतील असा विश्वास वाटतो.



**४) श्रीमती शशीताई घुले-भिडे, पुणे :** महिला विभाग समितीच्या प्रतिनिधी म्हणून प्रथमच निवड. यांचे शिक्षण एम्.ए. पर्यंत पूर्ण असून वयाची पंच्याहत्तरी ओलांडूनही नृत्य, संगीत व प्रवास हे छंद जोपासतात. सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून अनेक विद्यार्थ्यांना आर्थिक व शैक्षणिक मदत करतात. भिडे प्रतिष्ठानच्या कार्यामध्ये सक्रीय सहभाग व सल्लागार म्हणून कार्यरत आहेत. प्रतिष्ठानमध्ये महिला विभाग सुरू करण्याबाबत आणि प्रतिष्ठानची आर्थिक वृद्धी होण्याबाबत विशेष प्रयत्न.



**५) सौ. प्रिया सुनील भिडे, पुणे :** महिला विभाग समितीच्या प्रतिनिधी म्हणून प्रथमच निवड. लहान मुलांसाठी फिजिओथेरपिस्ट म्हणून प्रसिद्ध आहेत. सामाजिक कार्याची आवड. महाराष्ट्र चित्पावन संघ, चित्पावन फौंऊंडेशन यांच्या कार्यात सक्रीय सहभाग. प्रतिष्ठानच्या कार्यक्रमाकरिता ते त्यांच्या मालकीचे सभागृह विनामूल्य उपलब्ध करून देतात. संमेलनामध्ये सूत्र संचालन व हळदीकुंकु, भोंडला इत्यादी महिलांच्या कार्यक्रमामध्ये नियोजनाची जबाबदारी सांभाळतात.



प्रकाश प्रकाशनाचे हे साप्ताहिक प्रज्ञा प्रिंटिंग प्रेस, २८७, 'डी' वॉर्ड, गंगावेस, कोल्हापूर येथे छापून तेथेच प्रसिद्ध केले.
मालक, संपादक, प्रकाशक : श्री. प्रफुल्ल डवीर
(या अंकात प्रसिद्ध झालेल्या लेखातील मताशी संपादक सहमत असतीलच असे नाही.)
RNI No. M-6 (1457)/70-RNI

# विद्यार्थी गुणगौरव व ऋषितुल्य

## विद्यार्थी गुणगौरव

**गट क्र. १ - ४ थी व ७ वी स्कॉलरशिप परीक्षेत यश मिळविलेले.**

१) चि. मृणमय मंदार भिडे - रा. रत्नागिरी. ४ थी च्या स्कॉलरशिप परीक्षेत यश, एम्.टी.एस्. परीक्षा उत्तीर्ण, टी.एस्.ई. परीक्षेत ४ था क्रमांक

**गट क्र. ३ - १० वी शालांत परीक्षेत ८०% पेक्षा अधिक गुण मिळविणारे विद्यार्थी / विद्यार्थिनी**

१) कु. स्वानंद श्रीकांत भिडे, रा. रोहा-मुंबई विभाग. ८४.६०% गुण. सध्या (इलेक्ट्रिकल इंजिनियरींग) माणगांव रायगड येथे शिकत आहे. वडील एका कंपनीत असिस्टंट मॅनेजर अकौंट डिपार्टमेंट मध्ये आहेत. सौ. मधुरा श्रीकांत भिडे या सर्वोदय विद्यालय, उडकोली येथे मुख्याध्यापिका आहेत.

२) कु. देवयानी नितीन भिडे, पुणे विभाग - ९१.८२% सध्या मिलेनियम नॅशनल स्कूल, पुणे येथे शिकत आहे. वडील श्री. नितीन सॉफ्टवेअर इंजिनियर आहेत. आई सौ. स्नेहा मिलेनियम नॅशनल स्कूलमध्ये नोकरी करतात.



३) कु. समिधा मुकुंद भिडे - कोकण विभाग - ९२.१८% सध्या डी.बी.जे. कॉलेज चिपळूण येथे शिकत आहे. वडील लोटे परशुराम येथे खाजगी कंपनीत नोकरीस आहेत.

४) कु. आदित्य मिलिंद भिडे - कोल्हापूर ९२.७३% सध्या जयसिंगपूर येथे ११ वी (सायन्स) मध्ये शिकतो. वडील मिलींद माधव भिडे हे कुलकर्णी पॉवरलूममध्ये मार्केटिंग मॅनेजर (७४ ते ९८) होते. त्यानंतर २००१ ते १३ इंडस्ट्रियल मटेरियल दुकानाचे मालक आहेत. या विद्यार्थ्याचे आजोबा श्री. माधवराव पांडुरंग भिडे यांनी आदित्यचा (नातू) याचा फॉर्म पाठविला आहे.



५) कु. राजस प्रदीप भिडे - पुणे विभाग ९३.२७% वडील श्री. प्रदीप भिडे - सिरीयल्स, नाटक इ. कामे करतात.



६) कु. आदित्य नंदन भिडे - पुणे विभाग ९४% सध्या एस्.पी. कॉलेजमध्ये सायन्स शाखेमध्ये शिकतो आहे. वडील श्री. नंदन सारस्वत बँकेत डेप्युटी मॅनेजर आहेत. आई सौ. राधिका एच्.आर. डिपार्टमेंटमध्ये एका कंपनीत अॅडमीन एक्झिक्युटिव्ह आहेत. तसेच भिडे प्रतिष्ठानच्या अनेक कार्यक्रमांमध्ये या दोघांचाही सक्रिय सहभाग. कु. आदित्य हा संघ प्रार्थनाकार कै. न. ना. भिडे यांचा पणतू आहे.

**गट क्र. ४ - इ. १० वी शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी**

श्रीमती प्रियवंदा श्रीपाद भिडे, प्रभादेवी, मुंबई पुरस्कृत कै. श्रीपाद सखाराम भिडे स्मरणार्थ हे पारितोषिक

चि. आदित्य नंदन भिडे - पुणे विभाग ९४%

**गट क्र. ५ - इ. १२ वी शालांत परीक्षेत सर्वाधिक गुण मिळविणारा विद्यार्थी**

कु. देवव्रत शिरीष भिडे - ८४.१७% गुण, पुणे विभाग. सध्या डॉ. व्ही. एम्. सरकारी वैद्यकीय महाविद्यालय सोलापूर येथे वैद्यकीय अभ्यासक्रमाचे शिक्षण सुरू. वडील शिरीष केशव भिडे हे कमिन्स टेक्नॉलॉजी इंडियामध्ये डायरेक्टर ऑपरेशन्स म्हणून कार्यरत आहेत.

**गट क्र. ६ - १२ वी परीक्षेत ८०% किंवा त्यापेक्षा जास्त गुण** - कु. देवव्रत शिरीष भिडे - ८४.१७% गुण, पुणे विभाग.

**गट क्र. ७ - १० वी शालांत परीक्षेत मराठी विषयांत सर्वाधिक गुण** - श्री. बळवंत दत्तात्रय भिडे, अंमळनेर

पुरस्कृत कै. सिंधू विनायक भिडे यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक देण्यात येते.

कु. समिधा मुकुंद भिडे, कोकण विभाग हिला मराठी विषयात १०० पैकी ९२ गुण प्राप्त.

**गट क्र. ८ - १० वी शालांत परीक्षेत संस्कृत विषयांत सर्वाधिक गुण -** श्री. जनार्दन कृष्णाजी भिडे, विलेपार्ले, मुंबई पुरस्कृत हे पारितोषिक दोन विद्यार्थ्यांना संस्कृत विषयात समान गुण मिळाले असल्याने विभागून देण्यात येत आहे.

१) कु. देवयानी नितीन भिडे २) चि. आदित्य नंदन भिडे दोघांनाही १०० पैकी ९९ गुण

**गट क्र. ९ - १० वी शालांत परीक्षेत इंग्रजी विषयांत सर्वाधिक गुण -** भिड्यांची माहेरवाशीण सौ. स्नेहा रमेश आपटे पुरस्कृत, त्यांचे स्मरणार्थ हे पारितोषिक चि. आदित्य नंदन भिडे, पुणे विभाग

**गट क्र. १० - संगीत, नृत्य, नाट्य, गायन, वक्तृत्व किंवा क्रीडा अशा विषयात विशेष प्राविण्य मिळविणारे विद्यार्थी.**

१) चि. ऋषिकेश नरेन्द्र देव - हा भिड्यांची



माहेरवाशीण सौ. कीर्ती नरेन्द्र देव यांचा मुलगा आणि भिडे प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष श्री. कुमार भिडे, सांगली यांचा नातू आहे. दुसरीत असतांना सकाळ बालकुमार स्पर्धेत बक्षीस तसेच पेन्सिल, कलर पेन्सिल्स्, जलरंग या तीनही माध्यमातून चित्रे चितारतो. २०१० पासून चित्रगुरू आणि अनंतरंग आर्ट फौंडेशनचे संस्थापक श्री. अनंतराव भिडे व श्री. चित्रगुप्त भिडे यांचेकडे चित्रकला शिक्षण घेत आहे. चि. ऋषीकेशचे दर्पण आर्ट गॅलरी, पुणे येथे ऑगस्ट मध्ये एकल चित्रकला प्रदर्शन झाले होते. तो सध्या मिलेनियम नॅशनल स्कूलमध्ये इ. १० वीत शिकत आहे. त्याला भावी आयुष्यात आर्किटेक्ट होण्याचा मानस आहे. भिडे परिवाराकडून त्याला हार्दिक शुभेच्छा !

२) चि. सौरभ सारंग भिडे - इ. ६ वी मध्ये सांगलीत शिकत आहे. गीतेचे १८ अध्याय मुखोद्‌गत आहेत. श्री शारदा पीठम् शृंगेरी येथील संस्थेत गीता पाठांतर स्पर्धेकरीता ऑगस्ट २०१३ मध्ये सहभाग घेतला व त्या स्पर्धेमध्ये आदरणीय शंकराचार्यांच्या हस्ते प्रथम क्रमांकाचे रु. २१,०००/- चे पारितोषिक मिळविले.

## ऋषितुल्य

१) प्रभाकर चिंतामण भिडे, वय - ७६ वर्षे



निवेंडी कुलातील आहेत. १-१०-१९३८ रोजी जन्म. रेडिओ आणि इलेक्ट्रॉनिक्सचा कोर्स करून अणुशक्ती केंद्रामध्ये नोकरी केली. सध्या विलेपार्ले (मुंबई) येथे राहतात.

२) श्रीमती सुधा दत्तात्रय भिडे, वय ८२ वर्षे

१९-११-१९३२ रोजी जन्म. सध्या अमळनेर येथे स्थायिक आहेत. अमळनेरमध्ये भगिनी मंडळ आणि अमळनेर स्थापनेत सहभाग. राष्ट्र सेविका समितीमध्ये विशेष कार्य.

३) श्रीमती शांता दामोदर भिडे, वय ८३ वर्षे

१९३१ साली जन्म. माहेर नाशिक येथे. माहेरचे नाव सुमन केशव मनोहर. अतिशय प्रेमळ स्वभावामुळे नवीन पिढीमध्ये लाडक्या आहेत. स्वतः सुगरण आहेत.

४) सौ. प्रतिभा प्रभाकर पेंडसे, वय - ७७ वर्षे



मूळ गांव माभळे. संगमेश्वर, जि. रत्नागिरी. जन्म - २० -१-१९३७. यांचा विवाह प्रभाकर पेंडसे यांचेशी १९५९ साली झाला. विवेकानंद संस्थेत नोकरी. सर्व शालेय शिक्षण संगमेश्वर येथे झाले. पैसाफंड शाळेत (संगमेश्वर) ला शिकत असतांना त्यावेळी सुद्धा मुलींना शिक्षण मोफत होते हे विशेष.

# प्रतिष्ठानचे पुरस्कार

## माझी आई पुरस्कार – २०१४



सौ. प्रतिभा जयंत भिडे, ठाणे यांना कै. सुशिला रावजी भिडे, कल्याण यांचे स्मरणार्थ श्री. रावजी भिडे, कल्याण पुरस्कृत 'माझी आई' पुरस्कार २०१४ च्या भिडे कुलसंमेलनात डोंबिवली येथे प्रदान करण्यात येणार आहे. त्या स्वतः साहित्यिक आणि कवी असून त्यांचे 'मावळते चांदणे' आणि 'विभ्रम' असे दोन कविता संग्रह प्रसिद्ध झाले आहेत. आरती, कुसुमाकर, मोहिनीराज, साहित्यिक व प्राजक्त अशा विविध मासिकांमधून लेखन करीत असतात. श्री. जयंतरावांशी लग्न झाल्यानंतर अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत अनेक संकटांचा सामना करीत त्यांनी लेखणी व कल्पनाशक्ती जागृत ठेवली याबद्दल त्यांचे चिरंजीव केदार यांना आपल्या आईबद्दल अभिमान वाटतो. सौ. प्रतिभाताईंना झेना, अश्व साहित्यसेवा, त्रिवेणी आणि ठाणे महापौर यासारखे अनेक पुरस्कार प्राप्त झाले आहेत. 'आम्ही भिडे' या आपल्या मुखपत्रातून त्यांच्या कविता व काही लेख प्रसिद्ध झालेले आहेत. सौ. प्रतिभाताईंना आपल्या घरचा 'माझी आई' पुरस्कार मिळतो आहे याबद्दल त्यांचे अभिनंदन व शुभेच्छा !

## आपली सून पुरस्कार – २०१४



सौ. उर्मिला अरविंद भिडे, रा. पुणे यांना सौ. मेधा उर्फ अनुराधा अविनाश भिडे, मिरज पुरस्कृत 'आपली सून' पुरस्कार २०१४ च्या भिडे कुलसंमेलनात डोंबिवली येथे प्रदान करण्यात येणार आहे. या एम्.एड्. असून उत्कर्ष मंदीर, मालाड या शाळेत ३५ वर्षे शिक्षिका म्हणून सेवा बजावून मुख्याध्यापिका म्हणून निवृत्त झाल्या. इयत्ता ४ थी व ७ वी च्या विद्यार्थ्यांना, शिक्षक व पालकांना स्कॉलरशिप परीक्षा यशस्वी होण्यासाठी बहुमोल मार्गदर्शन केले. सावित्रीबाई दत्तक योजनेत काही विद्यार्थी/विद्यार्थिनींचे पालकत्व स्वीकारले. राष्ट्र सेविका समिती पुण्यातील अनेक शाखांमध्ये रामायणावर व्याख्याने दिली आहेत. भगिनी निवेदिता संस्था, सांगाती ज्येष्ठ नागरिक संघ, कोथरुड आणि निवारा या वृद्धाश्रमाच्या माध्यमातून सामाजिक कार्य करतात. राष्ट्रपती पुरस्कार पुणे महानगरपालिका गौरव पदक, मुंबई महापौर पुरस्कार, समाज गौरव व ब्राह्मण सभा पुरस्कार यासारखे अनेक पुरस्कार प्राप्त झालेले आहेत. भिडे प्रतिष्ठानच्या अनेक कार्यक्रमांमध्ये त्यांचा उत्साही सहभाग असतो. परखड विचार आणि स्पष्टोक्ती हे त्यांचे विशेष गुण आहेत. त्यांचे पती श्री. अरविंद भिडे यांनी शिक्षणासाठी किंवा सामाजिक कार्यासाठी दिलेल्या प्रोत्साहानामुळे मला हे शक्य झाले असे त्या आवर्जून सांगतात. अशा या बहुगुणी आपल्या सुनेला भिडे परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा !

## कला पुरस्कार – २०१४



श्री. प्रसाद रमेश भिडे, डोंबिवली यांना श्री. कुमार विष्णू आणि श्री. वसंत विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत त्यांचे बंधू कै. सुभाष विष्णू भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ कला पुरस्कार २०१४ च्या भिडे संमेलनात डोंबिवली येथे प्रदान करण्यात येणार आहे.

महाराष्ट्र राज्य नाट्य स्पर्धेत दिग्दर्शकाचे प्रथम पारितोषिक तसेच उत्कृष्ठ नाट्याभिनय करतात. वडील रमेश भिडे ह्यांचा वारसा चालु ठेवला आहे.

## साहस पुरस्कार - २०१४



श्री. शैलेश रामचंद्र भिडे, रा. ठाणे यांना कै. श्रीकृष्ण भिडे प्रतिष्ठानचे कै. श्रीकृष्ण भिडे यांचे स्मरणार्थ श्री. रा. म. भिडे, निगडी पुरस्कृत साहस पुरस्कार २०१४ भिडे कुलसंमेलनात डोंबिवली येथे प्रदान करण्यात येणार आहे. श्री. शैलेश हे ४० वर्षाचे असून सध्या टाटा मोटर्स येथे नोकरीस आहेत. वयाच्या ११व्या वर्षीच त्यांनी माऊंटेनियरिंगचा अभ्यास पूर्ण केला. १९८५ पासून गिर्यारोहणास सुरूवात केली. सह्याद्रीतील २०० गड पाहिलेले आहेत. हिमालयात आतापर्यंत १६ वेळा पर्वतारोहण केले आहे. दरवर्षी मे महिन्याच्या सुट्टीमध्ये मुलांसाठी साहस शिबिरांचे आयोजन करतात. पुण्यातील माऊंटन क्रेस्ट या गिर्यारोहण संस्थेचे संस्थापक सदस्य आहेत. नुकत्याच झालेल्या एव्हरेस्ट मोहिमेसाठी या संस्थेच्या माध्यमातून ६ लाखाची मदत मिळवून देण्यात सक्रीय सहभाग होता. इंड्यूरो ३ या आंतरराष्ट्रीय साहसी क्रीडा प्रकारात दोनवेळा यशस्वी सहभाग. विशेष म्हणजे पत्नी सौ. श्रुती व स्वतःचा वाढदिवस रक्तदान करून साजरा करतात. स्वा. सावरकर मंडळ, पर्यावरण कट्टा व निसर्ग संवर्धन समितीच्या माध्यमातून वृक्षारोपण व संवर्धनासाठी सक्रीय आहेत. सामाजिक बांधिलकीच्या दृष्टीकोनातून वनवासी विभाग व आदिवासी भागातून भाऊबीज किंवा मकर संक्रांती सारख्या सणाच्या माध्यमातून सामाजिक मदत करण्यासाठी विशेष प्रयत्न करीत आहेत. निगडी येथे 'आधार' संस्था किंवा सांस्कृतिक पथकाच्या आवर्तन या माध्यमाद्वारे शिस्तप्रिय गणेशोत्सव कसा असावा या बद्दल विशेष आग्रही आहेत. वडील, आजोबा, काका यांचे संस्कार पहात घडलेले श्री. शैलेश यांना भिडे परिवाराकडून हार्दिक शुभेच्छा !


## उद्योजक पुरस्कार - २०१४



श्री. उमेश विनायक भिडे, मुंबई यांना श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली पुरस्कृत कै. विष्णुपंत उर्फ आण्णासाहेब भिडे, सांगली यांचे स्मरणार्थ उद्योजक पुरस्कार २०१४ च्या भिडे कुल संमेलनात देण्यात येणार आहे.

श्री. उमेश भिडे हे बी.ई., एम्.एम्.एस्. असून काही दिवस टाटा कंपनीत नोकरीस होते. त्यानंतर वडीलांच्या सहकार्याने त्यांनी कारखाना सुरू केला. नाशिक येथे ग्राईंडींग व्हील तयार करण्याचा कारखाना आहे ह्या शिवाय गुजरातमध्ये एक नवीन युनिट सुरू केलेले आहे.

## विशेष गौरव पुरस्कार - २०१४



श्री. गोपाळ कृष्ण भिडे, कल्याण यांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान तर्फे २०१४ च्या भिडे कुलसंमेलनात डोंबिवली येथे विशेष गौरव पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. त्यांची 'संपदा इनव्हेसमेंट' नावाची फर्म असून गेली २० ते २५ वर्षे ते हा व्यवसाय करीत आहेत. लोकांचा प्रचंड विश्वास असल्यामुळे आजमितीला पाच हजारांहून अधिक सभासद त्यांचेकडून गुंतवणूक करीत आहेत हे निश्चितच कौतुकास्पद आहे.

# मागे वळून पाहताना...

प्रभाकर वासुदेव भिडे, डोंबिवली
मो. ९९६७१८४८१७

आज वयाच्या ७९ व्या वर्षात पदार्पण करतांना मी सुखी, समाधानी व कृतकृत्यतेने भरून गेलेला आहे. प्रतिकूल परिस्थितीशी झगडत जे जे वांछिले ते ते मिळविले आहे.

माझा जन्म १९३५ सालचा. कळायला लागले तेव्हाची परिस्थिती व आत्ताची यात खूपच बदल झाले. साधारण मध्यमवर्गीय सुखात बालपण गेले. कारण तेव्हा सर्वांच्याच सुखाच्या कल्पना मर्यादित होत्या. तेव्हा स्वातंत्र्यलढ्याचे, दुसऱ्या महायुद्धाचे दिवस होते. साखर, रॉकेलसाठी रांगा लावाव्या लागत. बऱ्याच जीवनावश्यक वस्तूंची लढाईमुळे टंचाई होती. रेशन हा शब्द त्यावेळीच सर्वांचे परिचयाचा झाला.

आमच्यावर लोकमान्य टिळक, स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे विचारांचा पगडा होता. सुभाषचंद्र बोसांचा गवगवा व प्रभाव होता. म. गांधींचे नाव पण दुमदुमत होते. मी व माझे मित्र राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे शाखेत रोज जात असू. व्यायाम, शाळा व कुस्तीचे आखाडे होते. सेवादलाचे नाव पण नुकतेच कानावर येत होते. त्यावेळी राष्ट्रीय सरकार स्थापन करून हिंदुस्थानींना मर्यादित स्वातंत्र्य देण्याची तयारी ब्रिटीशांनी केली. स्वर्गीय सावरकरांचे ओजस्वी भाषण पनवेलला टेनिस क्लब मैदानात झाले तेव्हा आम्ही आयुष्यातला प्रथमच ध्वनीवर्धक संच व ध्वनीवर्धित भाषण ऐकले. आमच्या बालमनात मुसलमानांबद्दल दुराव्याची व अविश्वासाची भावना व हिंदुत्वाची भावना प्रबळ होत होती. वृत्तपत्रे घरोघर येत नसत. ठराविक लोकांकडे फक्त 'केसरी' येत असे. वर्तमानपत्रे म्हणजे केसरीच ही समजूत खूप वर्षे कायम होती.

आम्ही चाळवजा वाड्यात राहात होतो. सर्वजण मध्यम वर्गीयच, सुखाच्या कल्पना अवास्तव नव्हत्या. त्यामुळे सर्वजण समाधानी होते. पण माणुसकी सर्वांचे वर्तनात भरकटलेली होती. माणुसकी जपावी असे मुद्दाम सांगाव लागत नसे. एकमेकांना निस्पृह मदत केली जायची. घरात पाहुणे आले आणि दूध किंवा साखर संपलेली असली तर हक्काने शेजाऱ्यांकडे मागायला संकोच वाटत नसे आणि कोणी नाकही मुरडत नसे. थँक्यू म्हणायची मानभावी प्रथा नव्हती आणि शिष्टाचार नसल्यामुळे वाईट वाटत नसे. मंगल कार्य कोणाकडेही निघाले तर ते प्रत्येकालाच आपल्याच घरातले वाटे. सर्व तऱ्हेची मदत केली जायची. मंगल कार्यालये व केटरिंग नव्हते. आचारी लग्न घरी जाऊन बुंदी पाडत व स्वयंपाक करीत. घरातील स्त्रिया व शेजारणी चार-पाच दिवस फराळाचे करायच्या यात कोणाला कमीपणा किंवा संकोच वाटत नव्हता. लग्न, मुंज म्हणजे लाडूच. बुंदीचे किंवा मोतीचुराचे हेच समीकरण. याशिवाय अन्य मुख्य पक्वान्न नसे.

माझ्या चार बहिणी माझ्यापेक्षा मोठ्या. तिघींची लग्न झालेली होती. आईचे अडचणीचे दिवसात काही अडत नसे. शेजारच्या काकू, वहिनी निरलसपणे वहिनींची सुंदर वेणी घालून देत असत. जाताना आई बहिणींना सांगे वेणी झाल्यावर काकुंना नमस्कार कर आणि गुंतवळ तेथे तसेच टाकू नकोस, उचलून टाक असा आपुलकीचा शेजार सर्वांना मिळायचा. माणसांचा माणसांवर विश्वास होता. माणुसकी व आपुलकी होती. आज वर्तमानाचा विचार करतांना आपण सर्वजण माणुसकीला पारखे झालो आहोत याची खंत व विषाद वाटतो. मोठे धनिक व्यापारी सामाजिक जाणिवेतून व अत्यंत अल्प मोबदल्यात शिक्षण व आरोग्य सेवा देत. आता अशा संस्था आर्थिक नफेखोरीच्या विचारातून उगवतात.

माझे वडील इंजिनियर होते व जिन फॅक्टरीची उभारणी करण्यात ते तज्ज्ञ होते. (कापसावर प्रक्रिया करण्याची मशिनरी) कारण कामानिमित्त सतत बाहेर असल्यामुळे आम्हाला वडिलांचा सहवास कमीच मिळाला. १९४५ साली वडिलांचे अल्पशा आजाराने निधन झाले. माझा मोठा भाऊ नुकताच इलेक्ट्रीकल-मेकॅनिकल इंजिनियरिंगची पुना कॉलेजातून परीक्षा पास होऊन उमेदवारी करीत होता. आम्हाला शेतीचे उत्पनाशिवाय आधार राहिला नाही.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर परिस्थिती प्रथम हळूहळू नंतर फारच झपाट्याने बदलत गेली व समाज जास्तीतजास्त स्वार्थाच्या बाजूला झुकत चालला होता. स्वातंत्र्यप्राप्तीनंतर ब्राह्मण समाज ज्याचे योगदान स्वातंत्र्य लढ्यात अधिकतम होते त्याच्यावरच द्वेषाने आपत्ती आणण्याचे काम केले जाऊ लागले. महात्मा गांधीवधाचे निमित्त होऊन ब्राह्मणांची वाताहात झाली. आम्हाला पण त्याची झळ लागून गाव सोडून परत पनवेलला यावे लागले. एवढे कमीच की काय? म्हणून लवकरच कुळकायदा आला. पुरोगामीतत्वाच्या नावाखाली महाराष्ट्रात या कायद्याची अविचारपूर्वक कठोर अंमलबजावणी करण्यात आली. शेती हेच आमच्या उदरनिर्वाहाचे अन्न आणि पैसा येण्याचे साधन झालं. आम्हाला अन्नाला वंचित होण्याची पाळी आली. सर्वांची परिस्थिती जवळजवळ सारखीच होती. फारच थोडे जे कोणी दूरदर्शी होते त्यांनी योग्य व्यवस्था केली व ते वाचले. पण असे थोडे होते बाकी सर्व भरडले गेले. पण नामशेष झाले नाहीत. लव्हाळ्याप्रमाणे परत ताठ उभे राहिले. आमचे कुटुंब त्याला अपवाद नव्हते. परिस्थितीशी झगडत उभे राहावे लागले. पण विचार व ध्येय उच्च असल्यामुळे भरकटत गेलो नाही. आम्हालाच दुसऱ्यांकडे वार लावावे लागले. खूप प्रतिकुल परिस्थितीशी ध्येय गाठण्यासाठी कष्ट करावे लागले. पण त्याच वैशम्य वाटले नाही. अनेकांचे मदतीने व आशिर्वादाने आम्ही सावरलो.

आज मागे वळून पाहतांना याच मात्र वैशम्य वाटते की समाज विस्कळीत होत आहे. सामाजिक बांधिलकीची भावना कळणारे स्त्रोत कमी होत आहेत. आपुलकी व मदत करण्याची वृत्ती लोप पावत आहे. गेले तीन दशके झपाट्याने प्रगती होत आहे. खूप नवे नवे शोध, नव्या सुविधा व सुखसोई बोटाचे अग्रावर उपलब्ध आहेत पण समाज आत्मकेंद्रित होत आहे. आपलेपण व माणुसकी आटत आहे याची खंत मागे वळून पाहतांना प्रकर्षाने जाणवते.

~~~

# आई रिटायर्ड होते !

आई रिटायर्ड होते तेव्हा आजी जन्म घेते
येरे माझ्या मागल्या अशी स्थिती होते
आयुष्याचा श्रीगणेशा पुन्हा सुरू करते
नातवंडांच करता करता तिची कंबर मोडते
न्हाऊ माखू घालते, दुधभात भरवते
त्यांना पाय फुटल्यावर मागे त्यांच्या धावते
जरा मोठी झाल्यावर शाळेत त्यांना पोहोचवते
स्वयंपाकपाणी करून आजोबांची मर्जी राखते
सत्तरीची आजी बाजारहाटपण करते
आजोबा तरी गुरकावतात
झालं की नाही, अजून किती वेळ लावते ?
थांबा हो जरा, राजूचं तोंड धुते
सगळ्यांचं सगळं करताना आजी थकून जाते
कशाला गं बाई एवढी धडपड करते
काय करू बाई सून माझी नोकरी करते
तुम्हीच सांगा,
आई कधी रिटायर्ड होते ?

संग्राहक - श्री. जयश्री प्रभाकर भिडे, डोंबिवली
मोबाईल : ०२५१-२४८६८७७
~~~

# मुंबईचे पहिले विभागीय संमेलन

सौ. पूर्वा प्रमोद देवधर (मुंबई) मो. ९८६९९३९०७२

मुंबई विभागाचे पहिले संमेलन करण्याचे ठरताच आम्ही सारे कंबर बांधून सरसावलो. आमच्यात सर्वात लहान चैतन्य भिडे व सर्वात जेष्ठ श्री. श्रीधर भिडे या दोघांचाही उत्साह दांडगा व अगदी वाखाणण्यासारखा होता. सर्वात महत्वाचे व किचकट काम होते ते आमंत्रण पत्रिका वाटायाचं. त्यातल्या अर्ध्याहून अधिक परत आल्या होत्या. योग्य पत्ता व योग्य व्यक्ती यांचा मेळ घातला नव्हता. शेवटी पोस्टाचा व कुरियरचाही नाद सोडून आम्ही प्रत्यक्ष जाऊन हँड डिलिव्हरी करण्याचे ठरविले. या कामात विविध बरे वाईट अनुभव आले. एका ठिकाणी जरा साशंक नजरेने घरात घेतलं पण मी नीट सारं समजावून सांगितल्यावर पाणी, चहा, जेवणाचाही खूप आग्रह झाला सरतेशेवटी ये गं पुन्हा माहेरी; आज फक्त चहाच घेतला आहेस पुढच्या वेळी जेवल्याशिवाय सोडणारच नाही असेही घडले. एका श्रीमंत घरात नोकराकरवी अर्धा ग्लास पाणी मिळालं, घरातला 'मॅनेजर' माझा उद्देश ओळखून खांदे उडवून पुन्हा स्वतःच्या खोलीत निघून गेला. त्याच क्षणी वाटले की श्रीधर भिड्यांनी या वयात पत्ते शोधताना किती त्रास घेतला असेल ? हो; पण काहींनी छान उत्साहही दाखवला. पण फक्त फोनवरच. काहींना मनापासून आनंदही झाला. पण त्यांचे 'गुडघे' साथ देत नव्हते. पण तुम्ही चांगलं करताय, आपल्या माणसांसाठी. असे म्हणत दिलेला आशिर्वाद हजार हत्तींचं बळ देऊन गेला. संमेलनाच्या तयारीसाठी सभा होत होत्या. संमेलनाचे पूर्वनियोजन करण्यासाठी एकदा श्री. प्रदीप भिडे यांचीही भेट झाली. स्टेज पक्कं नव्हते. पण सातत्यसुद्धा नव्हते. मग गुच्छ कोणाकोणाला द्यायचे ? कुठल्या क्रमाने कोणीकोणाला द्यायचे ? पुन्हा स्क्रीप्टमध्ये बदल. सातारा संमेलनातल्या भावंडांच्या भांडणासारखा प्रसंग होऊ नये म्हणून आम्ही एका 'जेष्ठ' भिड्यांशी बोलून एकदाचं काय ते फायनल केले. अर्थात सातारा संमेलनात, निरोपाच्या वेळी जो काय मनमोकळेपणा दिसला तो खरं तर सर्वात जास्त मनोरंजक होता. अगदी 'चेरी ऑन द केक'.

मग आम्ही वारंवार भेटून सअभिनय व सपाठांतर प्रॅक्टिस केली. तर ऐनवेळी विंगमधल्या पंख्याच्या वायरने संपदाच्या पायाला प्रेमाने विळखा घातला व एकत्र एंट्री घेत वाक्य म्हणायचं ठरल्याने मी एकटीच पुढे गेले. सुदैवाने फार लागलं नसल्याने संपदा व पंखा (वायरसह) सुखरूप आहेत. 'माईक कोणाच्याही हातात द्यायचा नाही' असे बजावण्यात आले. किमान चार जण तरी माझ्या हातातून माईक घेऊन गेले. 'एकच सेकंद, दोनच मिनिटे अस म्हटल्याने माझाही नाईलाज झाला. त्यात मी बापडी माहेरवाशीण. विरोध तरी कोणाला किती आणि कसा करणार ? कार्यक्रमात रूक्षपणा राहू नये म्हणून मी अधूनमधून विनोदाचा शिडकावा करण्याचा प्रयत्न करीत होते. शिवाय कार्यक्रम उशिरा सुरू झाल्याने गानवृंदातील 'अनघा भिडे' यांची काही गाणी रद्द करावी लागली. ती एक रूखरूख कायमची मनाला लागून राहिली आहे. पण बाहेरगावचे भिडे रात्री वेळेवर जेवून जावेत हा एकच उद्देश त्यामागे होता. एकंदरच आमचं मुंबईचे पहिले संमेलन उत्तम झाले असे म्हणायला हरकत नाही.

~~~

## निवेदन

गेली २ ते ३ वर्षे मात्र एका गोष्टीचे शल्य जाणवते आहे ते म्हणजे प्रतिष्ठानकडून कला, आपली सून, उद्योजक, साहस/क्रीडा व माझी आई हे पुरस्कार दिले जातात. परंतु नामांकन देण्यासाठी आळस म्हणा किंवा उदासिनता दिसून येत आहे. तसेच विद्यार्थी गुणगौरवसाठी विद्यार्थी वर्गाकडून म्हणावी तितकी चढाओढ नाही. म्हणून पुन्हा एकदा आवाहन करतो की भिडे प्रतिष्ठान किंवा संमेलन हे भिड्यांनी भिड्यांकरिता आयोजित केलेले असते म्हणून पुढील वर्षी भरघोस प्रतिसाद मिळेल अशी आशा बाळगतो.
~~~

# भिडे भगिनींचा भोंडला

दिलीप वासुदेव भिडे (पुणे)
मो. ९६५७५४१२३६

भिडे कुल भगिनी व माहेरवाशीणींनी आयोजित केलेला भोंडला कार्यक्रम दि. १६ ऑक्टोबर २०१३ रोजी आनंद मंगल कार्यालय, पुणे येथे सायंकाळी संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या माध्यमातून सौ. उर्मिला भिडे यांनी नियोजन केलेल्या प्रश्नमंजुषा कार्यक्रमामध्ये अपेक्षेपेक्षा उपस्थिती कमी असून सुद्धा रंगत आली. उपस्थित असलेल्या सर्व महिलांना काही वस्तुनिष्ठ प्रश्नांचा कागद देऊन ठराविक वेळात त्याची उत्तरे लिहून द्यायची होती. त्यानंतर सर्वात जास्त प्रश्न सोडविणाऱ्याला प्रथम, द्वितीय व तृतीय आणि उत्तेजनार्थ ५ अशी बक्षिसे देण्यात आली.


सर्वात जास्त प्रश्न सोडविणाऱ्या भगिनीचे बक्षीस सौ. जयश्री कीर्तने, द्वितीय क्रमांक सौ. रोहिणीताई सोमण व कु. राजश्री भिडे यांना विभागून देण्यात आले व तिसरा क्रमांक सौ. स्नेहल पाटणकर यांना देण्यात आला. त्याचप्रमाणे सौ. योगिनी, सौ. ज्योत्स्ना, श्रीमती प्रतिभा व सौ. अनिता भिडे आणि सौ. वीणा केळकर यांना उत्तेजनार्थ बक्षिसे देण्यात आली. प्रश्नमंजूषेच्या कार्यक्रमानंतर उत्तरपत्रिका तपासण्या दरम्यानच्या वेळात कु. राजश्री भिडे हिने अगदी कमीतकमी वेळात व कमी खर्चात कागदी फुले कशी तयार करायची याचे प्रात्यक्षिक दाखवून प्रत्येकाकडून फुले तयार करवून घेतली. त्यानंतर श्रीमती शशिताई घुले यांनी भोंडल्याची स्वरचित गाणी पारंपारिक गाण्यांच्या तालीवर सांगून त्यांच्या मागोमाग सर्व भगिनींनी म्हटली. भोंडला झाल्यावर खिरापत देऊन कार्यक्रमाची सांगता झाली.

या सर्व कार्यक्रमाचे नियोजन भिडे महिलांनी केले. याशिवाय प्रतिष्ठानला आर्थिक तोशिष लागू नये म्हणून कार्यक्रमाचा आर्थिक भारही सर्व महिलांनी मिळून उचलला. ही बाब कौतुकास्पद आहे. या कार्यक्रमाच्या संयोजनासाठी सौ. जयश्री, सौ. माया, श्रीमती प्रतिभा, सौ. प्रिया, सौ. अनिता, सौ. योगिनी, कु. राजश्री सर्व भिडे आणि सौ. सुलभा केळकर, श्रीमती शशिताई घुले, सौ. शर्मिला करंदीकर या सर्वांनी प्रमुख मदत केली. तसेच कार्याध्यक्ष श्री. शशिकुमार यांच्या सौजन्याने नेहमीप्रमाणे आनंद मंगल कार्यालयाचे मालक श्री. देसाई यांनी कमीतकमी खर्चात हॉल उपलब्ध करून दिला त्याबद्दल प्रतिष्ठान श्री. देसाई यांचे ऋणी आहे.

महिलांचे कार्यक्रमाबरोबर भिडे कुलबंधूंनासुद्धा समाविष्ट करण्याकरिता रक्षाबंधन, तिळगूळ समारंभ यासारखे कार्यक्रमाचे नियोजन करावे असे श्रीमती शशिताई घुले यांनी आपले विचार प्रकट केले. याबाबत त्यांचे विचाराशी प्रतिष्ठान सहमत आहे. या दृष्टीने जानेवारी २०१४ मध्ये तिळगूळ समारंभाच्या कार्यक्रमासाठी सर्वांनी मदत केली तर आपण असे कार्यक्रम सहजगत्या यशस्वी करू असा विश्वास वाटतो.

~~~

'आम्ही भिडे' या अंकास हार्दिक शुभेच्छा !



## चित्रगुप्त भिडे

- ★ मेकप आर्टिस्ट व मॉडेल फोटोग्राफर
- ★ कलात्मक फोटो सेशन्स,
- ★ पोर्ट फोलिओ आणि भरतनाट्यम् व कथ्थक नृत्यासाठी मेकप सह फोटोग्राफी केली जाईल.
- ★ तसेच फोटो व जुन्या निगेटिव्हज् (३५ एमएम / १२० एमएम) स्कॅन करून मिळतील.
- ★ शास्त्रोक्त पद्धतीने तबला-वादन शिकविले जाईल.

भेटा अगर लिहा

चित्रगुप्त भिडे - 'विश्वजीत' बंगला, प्लॉट नं. ६, सर्व्हेनं. ६७८, संत एकनाथ नगर-भाग२, बिबवेवाडी, पुणे ४११०३७.
फोन - (०२०) २४४७९०९५ / (०२०) २४२११६२०
मोबाईल - ९८२२१ ९९०५७
~~~

प्रतिबिंब..

# एका पंखाची भरारी

प्रदीप भिडे, पुणे
मो. ९९६७१८४८१७



माझा जन्म विजापूर (कर्नाटक) येथे झाला. वडील वकिल आणि आई गृहीणी आणि तीन मोठ्या बहिणी. माझं बालपण खूप मजेत गेलं. कारण घरात सर्वात लहान असल्यामुळे मी सर्वांचा लाडका. घरची परिस्थिती फार उत्तम नसली तरी खाऊनपिऊन बरं चाललेलं. वडिलांनी वकिली केलेली मी कधी पाहिलीच नाही. त्यांना नाटकाचे भयंकर वेड. शास्त्रीय संगीताची आवड आणि त्याचबरोबर अनेक वाद्ये वाजवण्याचा छंद होता. नापीक जमिनीला सुपीक बनवून वेगवेगळी पिके घेण्याची आवडही त्यांना होती.

वडिलांच्या बरोबर राहून नाटकाच्या तालमी पाहिल्या. त्यामुळे नाटकाची ओढ मला लागली. गणेशोत्सवात वेगवेगळ्या मंडळांसमोर कार्यक्रम सादर करणाऱ्या लोकांना एकत्र करून आपल्या 'कलोपासक' संस्थेतर्फे दोन अंकी नाटक स्वतः बसवून त्यांच्याबरोबर अनेक नाटकातून स्वतः काम सुद्धा केली व संपूर्ण बॅकस्टेजही स्वतःच सांभाळत. त्यांच्या नाटकांच्यावेळी प्रॉम्प्टींगची जबाबदारी माझी असायची. वर्षातून दोनदा दर्जेदार नाटकं गावातल्या लोकांना दाखवायची असा त्यांचा नियम होता. तालमींचा मुहूर्त कोजागिरी पौर्णिमेस व्हायचा. मी डिप्लोमाच्या पहिल्या वर्षात शिकत असतांना माझी आई कोजागिरी पौर्णिमेस दिवंगत झाली. व वडिलांनी त्यांच्या आवडीनिवडी बाजूला ठेवून संपूर्ण लक्ष माझ्यावरच केंद्रित केले. पुढे एक दीड वर्षातच त्यांना बहुतेक स्वतःचा मृत्यू दिसू लागला; म्हणून त्यांच्या जवळ असलेल्या सर्व क्लासिकल् म्यूझिकच्या कॅसेटस् ऐकायला सुरूवात केली. रेडिओवरील संगीताचे कार्यक्रमही सतत ऐकू लागले. आणि एक दिवस मला जवळ बसवून म्हणाले, ''माझं काही खरं नाही, पण माझी शेवटची इच्छा पूर्ण कर.'' मला धक्काच बसला व मी विचारलं, 'असं का म्हणताय?' तेव्हा ते म्हणाले, 'बाकी काही विचारू नकोस, पण जगाच्या पाठीवर कोठेही असलास तरी कला क्षेत्र सोडू नकोस.'आणि पुढे काही दिवसातच ते निवर्तले. आयुष्यभर स्वतः कलेला वाहून घेतलेल्या माझ्या वडिलांच्या मार्गदर्शनामुळे मी शालेय जीवनात नाटकांत आणि वक्तृत्व स्पर्धेत कधीही पहिला नंबर सोडला नाही. पण आता आई-वडिलांचे छत्र हरपलेला मी अवघ्या एकोणिसाव्या वर्षी या जगात एकटा पडलो. पण जिद्दीने शिक्षण पूर्ण करून गाव कायमचे सोडले व सांगलीस बहिणीकडे राहून तिच्या दुकानात व एका गॅरेजमध्ये काम करू लागलो. परंतु कला क्षेत्रात काम करायचे तर पुण्यासारखे गाव नाही, म्हणून मी पुण्याला आलो.

लहानपणापासून कष्टाची कामे, स्टेशनरी, साड्या यांचा व्यवसाय करीत आल्यामुळे पुण्यात आल्यावरही नोकरी करत असतांना साड्या, फ्रिज फ्रेशनर, सिलिंडर ट्रॉलीज, मेणबत्त्या अशा गोष्टींचे व्यवसाय केले. इन्श्युरन्स एजन्सी घेऊन त्याचेही काम केले. नवीन शहरात आल्यामुळे जागेचे भाडे, जेवणखर्च व इतर खर्च भागविण्यासाठी काम करीत राहिलो. आणि त्यातूनच वेळ काढून प्रायोगिक नाटकांतून, बालनाट्यांमधून कामे करीत होतो. पण कायमस्वरूपी फिरतीच्या नोकऱ्यांमुळे माझे व नाट्य क्षेत्रातले अंतर वाढत गेले.

गेल्या तीन वर्षापासून नोकरी व्यवसाय सोडून दिला व पूर्णपणे कलाक्षेत्रातच काम करायचे ठरविले. सुरूवातीला फिल्म्स्मध्ये, सिरियल्समध्ये पासिंग शॉट देणे, ज्युनियर आर्टिस्ट म्हणून काम करणे अशा संधी

आल्या. त्यातूनच आर्टिस्ट को-ऑर्डिनेशन, प्रॉडक्शन मॅनेजमेंटची माहिती करून घेऊन ती कामे केली. आणि 'आजी आणि नात' या चित्रपटाचे प्रॉडक्शन मॅनेजमेंटचे काम केले आणि मुंबईला शिफ्ट झालो.

मुंबईच्या कला क्षेत्राची काहीही माहिती नव्हती. कोठे जायचे, कोणाला भेटायचे हे काहीच कळत नव्हते. पुण्याहून निघतांना अनेक पुणेकर कलाकारांशी बोललो पण कोणीही कसलेही मार्गदर्शन केले नाही. पण सुजाताने (माझी पत्नी) मला सांगितले की, तू बिनधास्तपणे मुंबईला जा. मी घराकडे लक्ष ठेवीन. मी म्हटलं की, 'मुंबईत रूम रेंट इतर खर्च केवढे होतील ?' त्यावर ती म्हणाली, 'ही तर इन्व्हेसमेंट आहे. एखादा व्यवसाय करतो तशी आणि तू राहिलास की तुझ्या क्षेत्रातल्या लोकांशी संपर्क वाढेल, ओळखी होतील तसेच लगेच काम मिळाले नाही तरी डगमगू नकोस, नेटाने प्रयत्न कर.' तिच्या या बोलण्याने मला धीर आला. नोकरी सोडलेली, पुण्याचा खर्च, मुंबईचा खर्च. मग प्रयत्न सुरू केले. हळूहळू सह्याद्री वरील 'तेजस्विनी', 'ओढ लावी जिवा', 'नांदा प्रेम भरे', 'आतला आवाज', 'मोरया गोसावी' या सिरियल्स्मध्ये तसेच 'कृपासिंधू', 'ब्रह्मांडनायक', 'लेक लाडकी या घरची', 'स्वप्नांच्या पलिकडले', 'या वळणावर' अशा सिरियल्समध्ये वेगवेगळ्या भूमिका करायला मिळाल्या. पुन्हा मुलाची इ. १० वी म्हणून एक वर्ष पुण्याला राहण्यास आलो आणि 'कुरुक्षेत्र', 'पुनर्जन्म', 'लग्न पहावं करून' आणि 'दृष्टिदान' या फिल्ममध्ये कामे केली.

अलिकडेच 'झाला अनंत हनुमंत' या विजय तेंडुलकर लिखित नाटकात अनंताची भूमिका करायला मिळाली आणि या सर्वांहून महत्वाचं म्हणजे 'झी मराठी' वरील 'तुझं नी माझं जमेना' या मालिकेत डॉक्टरची भूमिका करावयास मिळाली. आता एखाद्या नावाजलेल्या चॅनेलवर मोठी सिरीयल मिळावी अशी इच्छा आहे.

## अरे हे चाललंय काय ??

अरे हे चाललंय काय ??
अरे हे चाललंय काय ??

कुणीही सोम्यागोम्या सहज मंत्री बनून जातो
ज्याने निवडून दिले त्याला सहजासहजी विसरतो
विसरतो जमिनीवर ठेवायचे पाय....

गल्लीतले चिंटू पिंटू सुद्धा फलकांवर झळकतात
अक्कलेचे कांदे दादा, भाई म्हणून मिरवतात
आजूबाजूला त्यांचे लक्ष तरी असते काय ?

करोडोंचे घोटाळे नी हजारो राजकारणी गुंतलेले
कुणालाच कुणाचे सोयरेसुत नाही उरलेले
आपला खिसा भरला, बाकी करायचेय काय ??

हजारो चिमुरड्यांवर अत्याचार होताहेत
लाखो लोक निसर्गाचा कोप सोसताहेत
पण त्यांच्याशी मंत्र्यांना देणेघेणे काय ?

सर्वसामान्यांना आता वाली नाही उरला
तो तर रोजच्या जगण्यालाच कंटाळला
कळत नाही त्याला आता करायचे काय ?

मित्रांनो, तरुणांनो हे वेळ नाही 'बंद' ची
आता वेळ आली आहे बंडाची, चिडून उठण्याची
नाहीतर पुढल्या काळात परत पारतंत्र्यात
जगायचे काय ????.......

सौ. प्रीती भिडे
सी-५०१, ट्रेझर पार्क, संत नगर, पुणे - ४११००९.
फोन : ०२०-२४२०३१६३, ९९२२९४४०८२

# मी का व कसा जैन झालो ?

अनुवाद : डॉ. वासंती मराठे
सौजन्य : श्री. कुमार विष्णू भिडे, सांगली

'मुक्तिकिरण' हे गुजराथी भाषेतील पाक्षिक पालडी, अहमदाबाद येथून प्रसिद्ध होत आहे. ऑक्टोबर २०१३ च्या अंकात कै. लक्ष्मण रघुनाथ भिडे, सांगली हे जैन मुनींच्या संपर्कात आल्यावर त्यांना जैनधर्माबद्दल आस्था निर्माण झाली ह्याचे आत्मकथन आहे.

प्रस्तावना :

अज्ञानामुळे लोक आचार्यश्रींना ओळखत नाहीत व म्हणून लोक त्यांना विरोध करतात. स्वतःजवळ सर्व सोईसुविधा असूनही ध्येयभ्रष्ट होऊन नमकहराम होणारे ह्या जगात खूप असतात. परंतु अशा स्थितीत संयमपूर्वक, कोणाकडून काही न स्वीकारता, स्वतः संकटात राहूनही दुसऱ्यासाठी परिश्रम घेणे हे काही येड्यागबाळ्याचे काम नाही. गरीबांना अन्न देणाऱ्याला आपण दानी म्हणतो व त्यांची प्रसिद्धी करतो. मग रोज रोज भाकरीची चिंताच करावी लागू नये अशी आपली स्थिती कोण करीत असेल. अशा प्रकारची प्राप्ती करून देणाऱ्यांची किती वाखाणणी करायला हवी ? पण अज्ञानामुळे अशा परम उपकारी महापुरूषाला लोक ओळखत नाहीत. त्यामुळेच लोक श्री रामसुरीजींना जाणण्याऐवजी त्यांचा अपमान करत आहेत. पण जगात असेही लोक असतात की मुनीश्रींची योग्यता व महत्ता जाणतात व त्यांना शरण जातात.

आत्मशुद्धीसाठी मार्गदर्शकाची आवश्यकता : श्री रामसुरजींच्या वीरवाणीने मला आलेली घोर निराशा दूर झाली. माझ्या स्वतःच्या कल्पनेप्रमाणे मी प्रयत्न करीत होतो पण कोणी मार्गदर्शक मिळविणे मला जमत नव्हते. पण योगायोगाने एकदा पू. श्री विजयरामजीसुरीजी पुण्यात आले असता त्यांचे प्रवचन ऐकण्याची मला संधी मिळाली. माझे सद्भाग्यच व माझे नैराश्य संपले.

सुशिष्य बनण्याचा प्रयत्न : लोकापवादाला भिऊन तसेच स्वच्छंद वृत्ति व इच्छाशक्ती व शारीरिक शक्तीच्या कमतरतेमुळे तात्कालिक त्यांचा शिष्य होणे मला शक्य वाटले नाही. पण त्यांचा शिष्य होण्याचा प्रयत्न करण्याचे मी सोडणार नाही. 'गुरू बिन कोन बताये बाट' हा माझा प्रश्न सुटला होता.

वाचन खूप केले पण जैन ग्रंथांच्या वाचनानेच माझी धर्म जिज्ञासा खूप तृप्त झाली. ज्या वयात मुले खेळण्यात, हुंदडण्यात दंग असतात त्या वयात मी दगडधोंडे जमवून त्यांची पूजाअर्चा करीत असे व भजन कीर्तनात रमून जात असे. मला कोणी खायला प्यायला दिले तरी इतर मुलांना देऊन टाकी. कुमारवयात इतर मुले जेव्हा फॅशन वगैरेत मशगुल असत तेव्हा मी स्नानसंध्या, होमहवन वगैरेत गढून गेलेला असे. तरूणपणी वेद, उपनिषदे, पुराणे व संत वाङ्मयाचा अभ्यास केला. निरनिराळ्या पंथाचे व धर्माचे ग्रंथ वाचून त्याचाही अभ्यास केला व शेवटी जेव्हा जैन ग्रंथ अभ्यासिले तेव्हा मात्र एक प्रकारची शांती मिळाली व माझी धर्मजिज्ञासा पुरी झाली असे वाटले.

खूप काही पण जीवन सार्थक केले असे वाटत नसे. जमाना बदलत होता त्याप्रमाणे मीही बरेच सामाजिक काम करू लागलो. रात्रशाळा चालवली. धर्मादाय वाचनालय सुरू केले. कॉंग्रेसचे प्रचार कार्य, सुत कताई कार्यक्रम, राष्ट्रीय शिक्षण, सत्याग्रहाश्रम वगैरे कार्यक्रमात भाग घेत सहा वर्षे घालवली. त्यानंतरची सहा वर्षे दोन दैनिके, पाच साप्ताहिक व दोन पाक्षिके चालवण्यास हातभार लावला. कित्येकांना मॅट्रिकपर्यंत शिकवले. सन्मार्गास लावले. बहुतेक सर्व प्रांतातील यात्रा केल्या. आणि तरीही जीवन अपूर्णच आहे असे वाटत राहिले.

जैन आचार्यश्रींना गुरू करण्याची इच्छा :

आत्मोन्नतीत मी अजून फार मागे आहे हे मला जाणवत होते. गुरू केल्याशिवाय तरणोपाय नाही हे ध्यानात आले व श्री रामसुरीजींच्या चरणी जाण्याचे ठरविले. खरे तर त्या मेरूपर्वतासमान आचार्यासमोर मी एक बारीक खडा. श्री रामसुरीजींच्या प्रवचनांनी व शिकवण्याने माझे मन

जागृत झाले. 'मी का व कसा जैन झालो' ह्या लेखमालेसाठी इतकी प्रस्तावना खपू आहे.

माझ्या पूर्वजांविषयी :

माझा जन्म त्रिप्रवरान्वित नित्युंदन गोत्रिय यजुर्वेदीय तैत्तरीय शाखा अंतर्गत हिरण्यकेशी शाखाध्यायी कोकणस्थ देशीय चित्पावन महाराष्ट्रीय ब्राह्मण घराण्यात झाला. आम्ही शांकर स्मार्त विचारसरणींचे. माझे पूर्वज रत्नागिरी जिल्ह्यातील. ते सर्व कार्यात पुढाकार घेत असत व त्या कारणांनी आम्हाला भीडा - भिडे हे आडनाव प्राप्त झाले. माझे पूर्वज यज्ञयाग, अध्ययन व अध्यापन, दान, धर्म व स्वकष्ट अशा ब्राह्मणांना योग्य कार्यात कालक्रमणा करीत असावेत. पण जेव्हा महाराष्ट्रातील मुलुखगिरीला सुरूवात झाली तेव्हा इतर जातीपाती प्रमाणेच आपले परंपरागत व्यवसाय सोडून युद्धकार्यात त्यांनीही झोकून दिले. असे सांगितले जाते की माझे खापर पणजोबा ह्या आंदोलनात सामील झाले. पटवर्धन सरदारांच्या बरोबर माझे खापरपणजोबा रघुजी (रघुनाथ) यांचा संबंध आला. व नंतर माझे पणजोबा रामचंद्र सांगलीस आले. आमच्या सांगलीच्या घरात पणजोबांनी लिहिलेली वेद, उपनिषदे, पुराणे कितीतरी हस्तलिखिते पेट्यातून भरलेली अजूनही आहेत.

माझे आजोबा सांगली संस्थानात तहसिलदार होत. पण तरीसुद्धा वैदिक कर्मकांड कायम चालू असे. मी त्यांना पाहिलेले आहे व वयाच्या अकरा वर्षापर्यंत माझ्यावर त्यांच्या चारित्र्याचा प्रगाढ प्रभाव झाला आहे. माझे दुसरे एक आजोबा (चुलत) हेड मास्तर होते. माझ्या बालपणात माझ्यावर त्यांनी खूप प्रेमपूर्वक संस्कार केले. धार्मिक संस्कृत श्लोकांचे वाचन व पाठांतर त्यांनी करवून घेतले. त्यांच्यामुळेच मला शिक्षणात आवड निर्माण झाली.

माझे वडील पोस्टमास्तर असल्याने दर दोन वर्षांनी त्यांची बदली होत असे. म्हणून मी माझ्या पणजोबांच्याकडेच राहात असे. माझे एक काका जमादार होते व दुसरे काका ड्रॉईंगचे शिक्षक होते. आम्ही चार भाऊ. त्यातील एकजण न्यु इंग्लिश स्कूलमध्ये शिक्षक आहे. माझ्याहून दोघा लहान भावांपैकी एकजण क्लार्क व दुसरा कंपाऊंडर आहे.

माझे बालपण, शिक्षण वगैरे :

११ फेब्रुवारी १९०० ह्या दिवशी बेळगाव जिल्ह्यातील शहापूरला माझा जन्म झाला. माझे काही शिक्षण वडिलांच्या बदलीच्या गावी व काही आजोबांच्याकडे झाले. १९१० ते १९१७ ह्या कालखंडात माझे मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण सांगली व पुणे येथे झाले. त्याच काळात मी वैदिक क्रियाकांड व खूप धार्मिक ग्रंथांचे वाचन केले. त्यांचा परिणाम म्हणून शंकराचे प्रत्यक्ष दर्शन झाले पाहिजे हा विचार मनात बळावला. व मी घरातून पलायन करून रामलिंगला जाण्यास निघालो. पण स्टेशन मास्तरांच्या ते लक्षात आले व त्यांनी मला घरी पोहोचवले.

आता मी रामतीर्थ, विवेकानंद इत्यादींचे वेदांतावरील ग्रंथ व शंकराचार्यांच्या ग्रंथांचे अभ्यास सुरू केला. आपला आत्माच परमात्मा आहे हा विचार समजू लागला व भक्तीची धून कमी झाली. जनसेवा हीच ईश्वरसेवा ह्यान टिळक, कर्वे व आगरकर यांचे लेखन वाचून उमगले व आपोआपच क्रिया कर्मकांड कमी होऊ लागले. पुणे व सांगली येथे कॉलेजमध्ये शिकताशिकता मी विद्यार्थी मासिक वाचू लागलो. विद्यार्थी संघाची स्थापना केली. वाचनालयाची देखरेख करत असे व रात्रशाला पण चालवली. ह्या प्रकारचे जीवन म्हणजेच धर्मपालन, ईश्वरभक्ती व देशसेवा असे मी समजू लागलो. १९१७ ते १९२१ पर्यंत मी कॉलेजला शिक्षण घेत होतो.

देशसेवेसाठी घरदार सोडले :

कॉलेज शिक्षणानंतर नोकरी करायची, व लग्न करून संसार मांडायचा. व हे करतांना होईल तितके धर्मसेवा व देशसेवा करायची असे ठरवले. पण गांधीजींची मुलाखत झाली व देशसेवेसाठी घर सोडले. त्या समयी कोणी आचार्यांनी सांगितले असते तरी मी धर्माकरिता घर सोडले नसते.

१९२१ मध्ये असहकार चळवळ सुरू होती. बेळगाव जिल्ह्यातील खानापूर तालुक्यात मी काँग्रेसचे काम व प्रचार खूप केला. १९२२ मध्ये मी निपाणीतील टिळक शाळेत शिक्षक होतो. त्याच सुमारास मी श्री आत्मारामजी व श्रीमत् राजचंद्र यांच्या ग्रंथांचा अभ्यास केला. १९२३ मध्ये मी साबरमती आश्रमात सुत कताई शिकण्यासाठी राहिलो होतो. तेथेही माझा स्वाध्याय चालूच असे. गिरनार व शत्रुंजयची यात्रा केली. त्यामुळे माझ्यावर जैनधर्माचा प्रभाव वाढू लागला. १९२४ साली कर्नाटकात बेळगाव भागात काँग्रेस अधिवेशनाच्या तयारीसाठी खूप फिरलो. तेव्हा दिगम्बर जैन मंडळींचापण सहवास घडला. १९२५-१९२६ मध्ये म्हैसूर संस्थानातील हरिहरक्षेत्रात तुंगभद्रा नदीकाठी सत्याग्रह आश्रम चालवला. मग मात्र देशसेवेतील रस कमी होऊ लागला व धर्माध्यायन करण्याची प्रवृत्ती वाढीस लागली. श्रवण बेळगावला एका दिगम्बर जैनमुनींच्याकडे अध्ययन करण्यास जात असतांना एका शेठजींच्या पत्राने बेत फिरवला. मोहात पडलो व अभ्यास व नोकरी करीत थोडी कमावण्याची इच्छा झाली. पण ज्ञानसाधना तर झालीच नाही व घरच्या लोकांना पण काही मदत करू शकलो नाही. गेल्या दहा वर्षात वर्तमानपत्रात लेखन करून जे कमावले होते ते हरिजन कार्यात खर्च झाले होते. एवढे करूनही कसलेच समाधान होत नव्हते. कारण माझे मन जैनधर्माकडे ओढ घेत होते. दैवयोगे पूज्य सद्गुरू आचार्य विजयसुरीजी पुणे येथे आले होते व त्यांच्या आश्वासनामुळे नवी आशा जागृत झाली.

~~~

# शाळा

चांदण्याची शाळा रात्री
भरली होती नभात
गुरूजी म्हणून 'चंद्र' सर
उभे होते टेचात

भूगोल त्यांचा पाठ होता
पहिल्याच त्यांच्या धड्याचा
पृथ्वी हा विषय होता
सर्वांच्याच जिव्हाळ्याचा

गणित त्यांचे कच्चे होते
चांदण्यांना माहित होते
आकडेवारी करतांना
बरंच काही चुकत होते

सर्व भाषा येत होत्या
संस्कृत होते फक्कड
गंमती गोष्टी सांगताना
हसत होते रग्गड

प्रकाशरूपी किरणांनी
वाजवली होती घंटा
रात्रीची शाळा आता
दिसणार नव्हती दिवसा

- विजय अनंत भिडे, ठाणे
मो. ९८३३०४५४६३

## ★ आवाहन ★

*१ ऑक्टोबर २०११ रोजी पुणे येथे झालेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये सभासद वर्गणी मधील १०० रु. चे सर्वसाधारण सभासद वर्ग रद्द केलेला आहे. त्यामुळे आश्रयदाता - रु. १०,०००/-, हितचिंतक रु. ५,०००/-, आजीव सभासद रु. १,०००/- हे तीनच वर्ग ठेवण्यात आले आहेत. तसेच या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये त्या अनुशंगे खालील निर्णय घेण्यात आला 'जे सभासद रु. १००/- भरून सभासद झालेले आहेत, त्यांनी अधिक रु. ९००/- भरून आजीव सभासदत्व घ्यावे.' अशा सभासदांना नित्युंदन गोत्रीय भिडे प्रतिष्ठान रु. ९००/- भरून आजीव सभासदत्व घेण्याचे विनंतीपूर्वक आवाहन करीत आहे याची नोंद घ्यावी.*
~~~

# सर्व गणेश भक्तांसाठी सुवर्णसंधी !

## श्री गणेश कला केंद्र



आमचे येथे १०० टक्के शाडूमातीच्या, शास्त्रशुद्ध गणेश मूर्ती उपलब्ध आहेत. आपला गणेशोत्सव पर्यावरणपूरक आणि शास्त्रशुद्ध साजरा करण्यासाठी गणेशमूर्तींची मागणी आजच नोंदवा.

**श्री. आदित्य सतीश भिडे**

**स्थानिक संपर्क : ८८०५० २६६३०, ७५८८० २३६१६**

गुरुप्रसाद, श्री स्वामी समर्थ सोसा. घर क्र. १४, श्रीधरनगर, धनकवडी, पुणे - ४३.
१६९७, सदाशिव पेठ, खजिना विहीर चौक, पुणे - ४११ ०३०



# *Satish Bhide*

**Investment Consultants, Estate Agent, Financial & Placement Services**

Ph. (0)020-2447 2316, R 24354353 Mob. : 98220 48661 E-Mail : bhidesatish@yahoo.co.in

# Savita Bhide & Co.

**Our Times Is Yours ! Call on us for :**

***Insurance *Mutual Funds/Loans/Company Deposits & Bonds *Sales/Purchase of Flat/Offices/Plots *Computation of I-Tax *Filling of I-Tax Return**

1697, Sadashiv Peth, Khajina Vihir Chowk,
Near Shailesh Raswanti Gruha, Pune 30.

# आमची भिशी चाळीस वर्षांची झाली

सौ. नीला कुमार भिडे, सांगली
मो. ९८२२०८५३८२

परवाच आमच्या भिशीने ४० वा वाढदिवस साजरा केला. ६-७-१९७३ रोजी सुमिताच्या मुलीच्या (अमृताच्या) बारशादिवशी सुमिताने भिशीची कल्पना मांडली. बारशाला जमलेल्या आम्ही चार मित्रांच्या बायका विजया, यशोधरा व मी (नीला) यांना ही कल्पना आवडली. भिशीच्या निमित्ताने महिन्यातून एकदातरी घरातून बाहेर पडता येईल अशी कल्पना सगळ्यांचीच होत. दरमहा १० रु. भिशी ठरली.

आता मजा वाटते. पहिल्या सभासद आम्ही चौघी. सुमिता जोशी, यशोधरा घारपुरे, विजया बुर्ली व मी नीला भिडे. यातील मी व विजया कर्नाटकातील, तर सुमिता व यशोधरा पक्क्या महाराष्ट्रीयन. पण आमच्या मैत्रीत भाषावार प्रांतरचना कधी आड आली नाही. की कानडी-मराठी वाद उठला नाही. आमची मैत्री आजही तितकीच दृढ आहे. तोंडओळखीच्या मैत्रीणी सख्या व नंतर एकमेकींच्या जीवलग मैत्रिणी कधी झालो हे कळलेच नाही.

सुरूवात केल्यानंतर काही जणी थोड्याकाळाकरिता जमल्या व सोडून गेल्या. काही कायम राहिल्या. माझी धाकटी जाऊ मंजिरी, तिची मैत्रीण मीरा दीवाण, आमच्यासमोर राहणारी अंजली पालकर अशा आम्ही मैत्रिणी वाढत गेलो. बारा जणी झालो. त्यातील भारती देवलने भिशी सोडली. वैशाली साठे पुण्याला स्थायिक झाली. अलिकडच्या काळांत शैलाताई केळकर आमच्यात सामील झाल्या. ललिता लिमये म्हणजे आमच्या भिशीतील व्यासंगी भगिनी. तर सुचेता तेलंग गायिका.

मध्यंतरीच्या काळात आम्ही ५-६ जणी ब्रिज शिकलो. खूप खेळलो व अजूनही खेळतो. मुले थोडी मोठी झाल्यावर खूप ट्रीपा केल्या. साधारणपणे आठ दिवसांची वर्षातून एक ट्रीप. त्यासाठी पक्ष पंधरवडा निश्चित केला. कारण तेव्हा मुलांच्या परीक्षा किंवा सणवार नसतात. हवाही चांगली असते. दरवेळी ट्रीपला निघताना गाडी सुरू झाली की सगळ्यांनी एकदम 'मंगलमूर्ती मोरया' म्हणायचो. प्रत्येकवेळी प्रवासाला निघताला माझी ती सवय अजून कायम आहे.

दर वर्षीच्या या ट्रीपला ६-७ जणी व्हायचो. सगळ्यांनाच काही ना काही कारणाने जमायचं नाही. म्हणून एक मग वर्षातून एक ट्रीप आठ दिवसांची व एक ट्रीप एक दिवसाची. अशी सुरूवात केली. वर्षातून एक दिवस काढणे सगळ्यांना सहज जमायचं. अशाही ट्रीपा खूप केल्या.

सगळ्या ट्रीपची आखणी, रिझर्व्हेशन सुमिता करायची. निघाल्यापासून परतण्यापर्यंतचा प्रवास कसा करायचा हे ती ठरवायची व त्याप्रमाणे परतीपर्यंतची रिझर्व्हेशन करायची. त्यामुळे घरच्या लोकांनाही आमचा प्रवास कसा चालणार व कोणत्या दिवशी कोणत्या गाडीने परतणार हे पक्क ठाऊक असायचं. प्रवासात ज्या ठिकाणी उतरू तेथील हॉटेल्स, रिक्षा, बसेस, खाणे-पिणे या साऱ्यांचा हिशोब अंजली करायची. ठराविक रक्कम तिच्याकडे दिली की आम्ही बाकीच्या मोकळ्या असायचो. तिच्याकडील ते पैसे संपले की ती सांगेल तेवढे पैसे परत दिले की आम्ही सुखी. या साऱ्याचा हिशोब घरी परत आल्यावर सवडीने करून पुढच्या भिशीत दिला जायचा. पण याबद्दल कोणाचीच काही तक्रार नसायची. कुणी त्यावर अविश्वासही दाखवला नाही. जे देणे-घेणे असेल ते तेव्हा पुरे होई. ते ही अंजली सांगेल त्याप्रमाणे. तिनेही हिशोब लिहून ठेवलेला असायचा. तो ती दाखवायचीही. पण तो कुणी फार गांभीर्याने घेऊन, त्याकडे अगदी पाहून त्याचा किस पाडत नसत. कारण मुळात एकमेकींचा विश्वास.

या ट्रीपमध्ये आमच्या आरोग्याची काळजी व जबाबदारी डॉक्टर असल्याने यशोधरा घेई. दिवसातून एक तरी सफरचंद खालं पाहिजे असा तिचा कटाक्ष असायचा. तिच्या पिशवीत नेहमी सफरचंद असायचीच. मद्राससारख्या समुद्र किनाऱ्याच्या शहरात उन्हात हिंडताना एक तरी शहाळे दिवसाकाठी प्यायचंच असाही तिचा आग्रह असायचा. त्यामुळे आमच्या तब्येती छान राहायच्या आणि ट्रीप मजेत पार पडायची. ट्रीपमधील काही गमतीजमती अजूनही लक्षात आहेत. एक दिवसाच्या ट्रीपमध्ये खूप मौजमजा केली.

एकमेकींच्या अडचणीच्या चिंतेच्या काळात कधी

धीराचे दोन शब्द बोलून तर कधी अबोलपणे आधार देत राहिलो. या मैत्रिणी आपल्याबरोबर कायम, कोणत्याही परिस्थितीत आहेत हा विश्वासच मनोमनी कायम होता, आहे व राहील.

या ४० वर्षांच्या काळात आमच्या भिशीला दोन मजेशीर नावे मिळाली. सुमिताच्या मिस्टरांनी, डॉ. अरूण जोशी यांनी आमच्या भिशीला 'कडकलक्ष्मी भिशी मंडळ' असे नाव दिले होते. तेही आम्ही हसून सोडून दिले व त्याची मजा घेतली.

गडेपंचविशीत आपापल्या बाळांना दुपट्यात घेऊन येणाऱ्या व एकमेकींच्या बाळांना जरूर पडली तर सहज सांभाळणाऱ्या आम्ही मैत्रीणी, नातवंडांची कौतुकं करण्यात कधी रमलो कळलंच नाही. अशी वर्षे गेली. साठी उलटली. प्रत्येकीच्या काहीतरी तब्येतीच्या तक्रारी सुरू झाल्या. ट्रीपा बंद झाल्या. कोणाच्या हातात काठी आली. तर कोणाला मानेला, पाठीला पट्टा असे दागिने आले. कोणाला कवळी आली. मग सुमिताने एका भिशीत नवं नाव जाहीर केलं. 'काठी, कवळी, मऊ भात भिशी'. तेही सगळ्यांनी 'अगदी खरं आहे' असे म्हणून मान्य केले. त्याच वेळी एक ठरावही एकमताने मान्य झाला. 'आपली ही भिशी ज्या पहिल्या दोघी देवाकडे जातील त्यांनी तिथेही लगेच सुरू करायची. बाकीच्या जशा येतील तशा सामील होतील.' हेही सगळ्यांनी हसून आणि एकमेकीला टाळ्या देऊन साजरं केले. हल्ली वयोमानानुसार प्रत्येक भिशीच्या शेवटी अगर सुरूवातीला २-३ स्तोत्र म्हणतो. त्या दिवशीही तशी म्हणून ही आमच्या सगळ्यांची इच्छा फलद्रूप होवो अशी प्रार्थना केली.

भिशीला अशी कितीतरी मजेशीर नावं मिळाली तरी खरं मनातलं नावं एक राहील. 'आपली भिशी' ज्यात आहे आपुलकी, प्रेम, स्नेह, माया. आमची साठी झाली तरी बुद्धी नाही झाली नाठी, तर स्नेह मैत्रीच्या घट्ट झाल्या गाठी. तेव्हा 'आपली भिशी' अशीच कायम राहो. अगदी स्वर्गात गेलो तरी.

~~~

समस्त भिडे कुलोत्पन्न ज्ञाती बांधवांस सप्तशती ज्वेलर्स तर्फे
विशेषतः हे सम्मेलन यशस्वी व्हावे म्हणून झटणाऱ्या कार्यकर्त्यांना
**कृतज्ञतापूर्वक शुभेच्छा !**

अनेक नामवंत कोकणस्थ घराण्यांचे सोन्याचे व्यवहार सांभाळणारी, डोंबिवली येथील
मध्यवर्ती ठिकाणी असलेली, आत्मीयता, जिव्हाळा व विश्वास जपणारी,
**अगणित चित्पावन मंडळींचे अनंत आशिर्वाद लाभलेली सुप्रसिद्ध पेढी.**

सोन्याची शुद्धता व कमीतकमी मजुरी.
**योगेश्वरी देवीची रौप्यमुद्रा ना नफा ना तोटा तत्वावर मिळेल.**
निव्वळ सोने खरेदी अथवा विक्री केली जाते.
अप्रतिम डिझाईन्स व अगणित व्हरायटी . . . .

# सप्तशती ज्वेलर्स

**५०७, तळ मजला, कस्तुरी प्लाझा सोसायटी ऑफिस जवळ,**
**बी. विंग, मानपाडा रोड, डोंबिवली (पूर्व)**
**फोन : २८६ ३५ १२, निवास : २४५ २९४०, मो. ९२२४५११७५१**
~~~

# आगळे अवलिये माय-लेक

सौजन्य : दै. लोकमत
(लेखक : सुधीर गाडगीळ)

